सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४



मासिक
# नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्


वर्ष ८ वे : अंक ११

फेब्रुवारी २०२३

स्वागतमूल्य ₹. 30/-






प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,

मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५

Visit us on www.kolhapurchitpavan.com

ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com

https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे आयोजित बहारदार कार्यक्रम

# ‘बाबूजी आणि मी’

## श्रीधर फडकेंच्या स्वरांनी कोल्हापूरकर मंत्रमुग्ध









रविवार, दि. १५ जानेवारीला कोल्हापूर चित्पावन संघातर्फे विख्यात संगीतकार व गायक श्री. श्रीधरजी फडके यांच्या सुरेल गायनातून ‘बाबूजी आणि मी’ हा सुश्राव्य व देखणा कार्यक्रम संपन्न झाला.

मराठी मनाला सांगीतिक मोहिनी घालणाऱ्या स्वरप्रभू सुधीर फडके (बाबूजी) यांच्या अलौकिक प्रतिभेचा आविष्कार असलेली गाणी, शब्दप्रभू गदिमा, सुधीर मोघे यांनी अजरामर केलेली गीते आणि मराठी गाण्यांची परंपरा असा संगीतमय प्रवास घडवत श्रीधर फडके यांनी कोल्हापूरकरांना मंत्रमुग्ध केले.

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे केशवराव भोसले नाट्यगृह येथे आयोजित ‘बाबूजी आणि मी’ या संगीत कार्यक्रमात फडके यांनी मराठी संगीत विश्वातील अजरामर गाणी सादर करत रसिकांवर स्वरमोहिनी घातली. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष नंदकुमार मराठे यांनी केले. प्रास्ताविक उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी केले. यावेळी सिद्धार्थ गाडगीळ, सुबोध गद्रे, संचालक मकरंद करंदीकर, संगीता आपटे, श्रीकांत लिमये, केदार जोशी, विनोद डिग्रजकर, मोहन दातार, ऋषीकेश लिमये, किरण जोशी, सीमा गोखले उपस्थित होते. सूत्रसंचालन मनीष आपटे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात फडके यांनी ‘देव देव्हाऱ्यात नाही’ या गाण्याने केली. त्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय बनले. त्यानंतर ‘देवाचीये द्वारी’, ‘सखी मंद झाल्या तारका’ अशा गाजलेल्या गाण्यांनी रसिकांवर संगीत वर्षाव केला. प्रत्येक गाण्यामागे त्याचा इतिहास, बाबूजी आणि त्यांच्यामध्ये घडलेले किस्से सांगत त्यांनी जुना संगीताचा जादूई काळच लोकांसमोर मांडला. गाणे कसे घडले, त्या वेळचे प्रसंगही त्यांनी उलगडले. ‘मी राधिका, मी प्रेमिका’ अशा प्रेमगीतांना तर लोकांनी डोक्यावर घेतले. सुकन्या जोशी यांनी खुमासदार निवेदन केले. संगीत साथ शिल्पा पुणतांबेकर, शेफाली कुलकर्णी, तर वादन साथ सचिन जगताप, ओंकार पाटणकर, अनिकेत ससाणे यांनी दिली.

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक ११ : फेब्रुवारी २०२३**



- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


**अनुक्रम**


१) **संपादकीय** /४

२) **आम्ही कृष्णसख्या** /५
- ज्योत्स्ना शिंत्रे

३) **म्हणींचे म्हणणे** /८
- वैदेही जोशी

४) **उंबरा** /९ - केदार जोशी

५) **आरोग्यम् धनसंपदा** /११

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १२
- सौ. मंजुश्री गोखले

७) **ज्ञानसूर्याची सावली** /१४
- सौ. मंजुश्री गोखले

८) **भारतीय राज्यघटना- एक सामाजिक करार** /१६
- डॉ. सुभाष आठले

९) **संवाद** / २४
- वैभव फाटक

१०) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे, विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २३ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी,

अहो आत्ता सुरू झालय म्हणेपर्यंत २०२३ चा फेब्रुवारी महिना आला सुद्धा ! संकल्प केलेले आहेत का काही? आणि मुख्य म्हणजे ते सुरू आहेत का? बहुधा नसावेत. जाऊ द्या हो ! आपल्यासाठी संकल्प असतात. संकल्पासाठी आपण नाही ! पण आमचा मात्र संकल्प सुरू आहे हो ! जे जे उत्तम, उन्नत ते ते तुम्हाला नवस्नेह मधून देण्याचा ! म्हणूनच या महिन्यापासून तीन नवीन लेखक आपले नवीन विचार घेऊन आपल्या भेटीला येत आहेत. मुंबईच्या ज्येष्ठ लेखिका ज्योत्स्ना शिंत्रे सांगताहेत, 'कृष्ण सख्यांबद्दल' तर कोल्हापूरच्या आपल्या लाडक्या लेखिका वैदेही जोशी सांगणार आहेत, म्हणींचे म्हणणे. तर मुंबईचे वैभव फाटक साधताहेत संवाद पिढी-पिढीतला. शिवाय आपली नेहमीची सदरे आहेतच.

परवा ८ जानेवारीला आपण आपल्या सर्व ज्ञाती बांधवांना एकत्रित करून धुंदूरमासाचा कार्यक्रम केला. इतका अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला ना ! जो इतक्या वर्षात कधीच मिळाला नव्हता. या अभूतपूर्व प्रतिसादामुळे सगळ्यांनाच उत्साह आला आणि तो कार्यक्रम अधिकच देखणा झाला. त्यासाठी सर्व ज्ञाती बांधवांना हार्दिक धन्यवाद ! तसाच १५ जानेवारीच्या कार्यक्रमालाही लोकांचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. कार्यक्रम दर्जेदार असला की लोकांचा प्रतिसादही उत्तम असतो हे सत्य पुन्हा एकदा अधोरेखित झालं. एकंदर जानेवारी महिना, तोही २०२३ चा असा उत्साह द्विगुणित करणारा ठरला. जानेवारीच्या अंकाच्या संपादकीयात मी म्हटलं होतं ना, 'आता तेविसावं लागलंय. शहाणे होऊया !' त्याचा हा परिणाम असावा. नवस्नेहचा परिणाम. दुसरं काय? कारण आमचे शब्द आम्ही नेहमीच पाळतो बरं का?

**लेकिन बात बात पर रंग बदले**

**इतने भी रंगीन नही हैं हम ।**

असो, हे नवीन विषय तुम्हाला कसे वाटतात किंवा आणखी कोणते नवीन विषय तुम्हाला वाचायला आवडतील ते आम्हाला कळवा हं ! आणि या अंकात 'भारताचे संविधान' ही आपण समजावून घेणार आहोत डॉ. श्री. आठले यांच्याकडून. ही माहिती संग्रहित करून ठेवावी अशी आहे मित्रांनो. नक्की संग्रहित करून ठेवा.

थंडी पडली आहे. पहाटेचा व्यायाम, फिरणं, योगासनं करा बरं ! मी मात्र मस्त दुलईत झोपून रहाते. कारण? फिरणं, व्यायाम रोजच होईल हो ! अशी थंडी वर्षातून कधीतरीच चार दिवस पडते. मग तिचा मान नको ठेवायला? आता ते तुम्ही ठरवा !

**पसंत अपनी अपनी, खयाल अपना अपना ।**

आता निरोप घेते.

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# आम्ही कृष्णसख्या

## (लेखांक पहिला)

'आम्ही कृष्णसख्या' ही लेखमाला सुरू करताना आपल्याला 'कृष्ण' या शब्दाचा खरा अर्थ समजून घ्यायला हवा, असं मला वाटतं.

महाभारत या महाकाव्यामध्ये कृष्ण किंवा श्रीकृष्ण हा एक महानायक पात्र म्हणून आपल्यासमोर येतो. पण कृष्ण म्हणजे महाभारतातील एक पात्र एवढेच त्याची व्याप्ती आहे का? याचा विचार करत असताना माझ्या मनात जे विचार आले, ते मी नमूद करीत आहे.

मुळात कृष्ण म्हणजे काळा. कृष्ण या शब्दाचा अर्थच मुळी काळा असा आहे. पण आपण भौतिक जगात जो काळा रंग पाहतो, तो त्याचा अर्थ आहे का? तर बिलकुल नाही. जगात आपण काळ्या रंगाला वाईट समजतो. काळी कृत्य, काळा बाजार, काळा पैसा अशा प्रकारचे शब्द आपण वाईटच अर्थाने वापरतो. एवढेच नाही, तर गुन्हेगारी प्रवृत्तीचा माणूस म्हणून काळानुरूप माणूस रंगवला जातो. काळ्या माणसांना म्हणूनच तर गोऱ्या लोकांनी नीच जातीचे समजून गुलामगिरीत ढकलले. आपल्या मनातही गोऱ्या माणसांबद्दल जे एक आकर्षण पटकन् येते, ते काळ्या माणसांबद्दल येत नाही. असो.

पण आपल्या संस्कृतीमध्ये कृष्ण हा 'काळा' या अर्थाने आलेला नाही, तर आकर्षक, सर्वसमावेशक या अर्थाने आलेला आहे. 'कर्षयति इति कृष्ण:' असा त्याचा अर्थ आहे. जिथे जिथे आकर्षण असतं तिथे तिथे काळा रंग असतोच.

ज्या रंगात सर्व नवरंग शोषले जातात, तो रंग काळा. ज्या ठिकाणी प्रकाश, उष्णता, वस्तू (matter), विकिरण (radiation) ती जागा म्हणजे कृष्णविवर. जिथे विश्वातील अनंत शक्तींची मानवाला जाणीव होते, त्या शक्ती मानवाच्या मनात कर्षित (absorb) होतात, ती अवस्था म्हणजे समाधी. तिथेच माणसाला काळ्याशार रंगाचा अनुभव येतो. जो एरवी मरणाच्या वेळी येतो. म्हणूनच यमाचा रंग आणि त्याचा रेडा काळा. संतांनी सांगून ठेवले आहे की – 'आपुले मरण पाहिले म्या डोळा, तो हा सोहळा अनुपम्य ।।'

यातील मरण म्हणजे मृत्यू नव्हे, एक भगवंताशी आत्म्याची एकरूपता असा घेतला पाहिजे. या समाधीचा रंगही काळाच; कारण अंतर्चक्षूसमोर वस्तू म्हणजे भगवंताचं रूप झगमगत असताना आजूबाजूला पूर्ण अंधार जाणवतच रहाणार.

कृष्ण आणि त्याचे जीवन समजून आले की, आपल्याला बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. सर्वप्रथम आपण कृष्णजन्माचा विचार करूया. कृष्णाचा जन्म अष्टमीचा, ती देखील वद्य अष्टमी आणि रात्री–मध्यरात्रीचा. असं का? कारण वद्य अष्टमीला आधीच अंधार असतो आणि त्यात श्रावण महिना. म्हणजे उत्तर भारतात पावसाची झड लागलेली. मध्यरात्रीची वेळ. त्यामुळेच या आठव्या अवताराचं रक्षण करता आलं. याचा काय अर्थ असू शकेल, हा विचार केला तर असे लक्षात येईल की अष्टांग–योगात सांगितलेली आठवी अवस्था – जी पूर्ण अवस्था आहे – ती आहे 'समाधी' अवस्था. तिचा संबंध काळ्या रंगाशी आहे. समाधी अवस्था गाठल्यानंतरच मनात उमटलेल्या प्रभू–रूपाशी एकात्मता घेऊ शकते. म्हणून तर कृष्णाच्या आयुष्यात आठ या आकड्याला महत्व होते. शिवाय कृष्णाचा जन्म मध्यरात्रीचा का? तर त्याने स्वत:च भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे – 'या निशा सर्व भूतानां, तस्यां जागर्ति संयमी' संयमी म्हणजे साधक. सगळा दिवसाचा कोलाहल शांत झाल्यावर साधकाला समाधी अवस्था सहज गाठता येऊ शकते. हा कोलाहल म्हणजे भौतिकही आहे आणि मानसिकही आहे. जेव्हा अशाप्रकारे मानसिक कोलाहलाची मध्यरात्र होते, तेव्हाच पहाटेचा ब्रह्ममुहूर्त सहज गाठता येऊ शकतो.

कृष्णाला जन्मत:च गोकुळात जावं लागलं.

'गो' म्हणजे शरीर, इंद्रिये; आणि 'कुल' म्हणजे ठिकाण. या दोन्ही गोष्टींवर जिथे विजय प्राप्त करता येईल असे ठिकाण म्हणजे 'गोकुळ'. या गोकुळात कृष्ण फक्त कुमार वयाचा होईपर्यंतचा राहिला. याचा अर्थ मी असा घेते की, काही वर्षापर्यंत कडक साधना करून समाधी अवस्था पूर्णपणे प्राप्त केल्यावर साधक त्याच्या जीवित कार्यासाठी - म्हणजे समाजाचे कल्याण करण्यासाठी सक्षम होतो, जसे कृष्णानेही गोकुळ सोडल्यानंतर आपले जीवनकार्य निश्चित केले. ते कार्य म्हणजे - 'परित्राणाय साधूनाम्, विनाशाय च् दुष्कृताम्'

साधकाच्या दृष्टीने याचा अर्थ मनातल्या वाईटाचे जास्तीत जास्त निर्दालन आणि चांगल्याचे जास्तीत जास्त परिशीलन.

हेच कार्य तर कृष्णाने पुढे आयुष्यभर केलं. जेव्हा जेव्हा मनातल्या वाईटाचे निर्दालन आणि चांगल्याचे वर्धन पुर्णत्वाला पोहोचते, तेव्हाच तर अंतर्मनामध्ये परमेश्वराचा अवतार होतो.' मानवधर्माची स्थापना होते.

'धर्मसंस्थापनार्थाय् संभवामि युगे-युगे'

प्रत्यक्ष भगवंतांनीच हे सांगून ठेवलं आहे, की हा असा अवतार युगानुयुगे होतच आहे.

आता आपण कृष्णाच्या भौतिक आयुष्याकडे वळूया. महाभारतात आणि इतर ठिकाणी सुद्धा जे कृष्णचरित्र आपण वाचतो, त्यात अनेक विवाद्य, आक्षेपार्ह मुद्दे असू शकतात. उदा. कृष्णाची स्वत:ची आठ लग्ने झालेली असताना त्याने १६१०० स्त्रियांशी लग्ने केली; म्हणजे तो स्त्रीलंपट होता, जनानखाना बाळगीत होता का? तर नाही.

या १६१०० बायका नरकासुराने बंदीत टाकलेल्या होत्या. त्यांना अनेक वर्षे नरकासुराच्या अत्याचाराचा बळी व्हावे लागले होते. काही जणींना त्यातून मुलेही झाली होती. सामाजिक दृष्ट्या कलंकित झालेल्या या अशा बायका कुठे जाणार? पुढच्या आयुष्यात त्यांचा कोण वाली असणार? त्यांची कैदेतून सुटका झाली खरी, पण समाज त्यांना स्वीकारणे शक्यच नव्हते. म्हणून कृष्णाने त्यांच्याशी लग्ने केली, त्यांना आणि त्यांच्या मुलांना स्वत:चे नाव दिले. अशा प्रकारे त्या बायकांना सामाजिक प्रतिष्ठा दिली. मूळचे नाव भौमासूर (पृथ्वीपुत्र) असे असताना सुद्धा नरकासमान कृत्यांमुळे त्याला नरकासूर असे नाव मिळाले होते. या १६१०० बायकांची आणि नरकासुराच्या इतर प्रजाजनांची देखील नरकवासा-सारख्या आयुष्यातून मुक्ती देण्याचे काम कृष्णाने केले आणि सुखाचा प्रकाश त्यांना दाखवला.

भौमासूर (नरकासूर) हा भूमीचा, म्हणजे पृथ्वीचा आणि श्रीविष्णूंचा पुत्र होता. तरी तो असा झाला होता. त्याला मारले म्हणजे कृष्णाने त्याला त्याच्या आयुष्यातल्या श्रीविष्णूच्या म्हणजेच परमेश्वराच्या अंशाची जाणीव करून दिली आणि त्याच्यात असलेले अनेक दुर्गुण नष्ट करून, त्याला मोक्षाचा रस्ता दाखवला असा एक आध्यात्मिक अर्थ आपण लावू शकतो. असा अर्थ जर आपण घेतला तर त्याच्या तावडीत असलेल्या असंख्य स्त्रिया आणि त्याचे नागरिक म्हणजे त्याच्या मनात असलेले असंख्य दुर्गुण असे आपण म्हणू शकतो. त्या सर्वांना योग्य मार्गाला लावून कृष्णाने त्यांच्याशी विवाह केला म्हणजे स्वत:त त्या दुर्गुणांना विलीन करून, नरकासुराला मोक्ष प्राप्त करून दिला. स्वत:च्या दुर्गुणांच्या आहारी गेलेल्या वंशजांना देखील कृष्णाने अशाच प्रकारे नष्ट करून टाकले आणि द्वारकानगरी स्वच्छ करून टाकली.

अशा या कृष्णाच्या आयुष्यात काही स्त्रिया त्याच्या सख्या म्हणून आल्या. या स्त्रियांनी कृष्णाच्या आयुष्यात आणि कृष्णाने त्यांच्या आयुष्यात फार महत्त्वाची भूमिका निभावली. यातील काही स्त्रिया म्हणजे राधा, ललिता, मीरा, द्रौपदी, रुक्मिणी, सत्यभामा, वृंदा इ.

या सर्व स्त्रिया फार वेगवेगळ्या कारणांनी कृष्णाच्या आयुष्यात आल्या. त्यांचे कृष्णाशी नाते पण फार वेगवेगळ्या प्रकारचे होते. पण एक गोष्ट मात्र निर्विवादपणे सत्य होती, की या सर्वजणी अंतरंगाने कृष्णाशी घट्ट जोडल्या गेलेल्या होत्या. त्यांच्यात कृष्णाबद्दलचा सखीभाव पूर्णपणे मुरला होता. त्यामुळे

त्या कृष्णाच्या सख्या होत्या. त्यांचे व्यक्तिमत्व मुळात विविध रंगांचे होते. पण कृष्णाने त्यांना असे काही आकर्षून घेतले होते, की त्या स्वत:चे सगळे रंग विसरून गेल्या. त्यांचे सगळे रंग कृष्णरंगात मिसळून गेले आणि त्या कृष्णच झाल्या. सगळे रंग एकाशेजारी एक ठेवून जोरात फिरवल्यावर ज्याप्रमाणे काळा रंग दृष्टीस पडू लागतो, तसेच या सर्व स्त्रियांच्या आयुष्याचे वेगवेगळे रंग कृष्णभक्तीने असे काही घुसळून निघाले, की त्यांची भक्ती-कृष्ण झाली, त्यांनी स्वत:ला कृष्णात विलीन करून टाकले.

यापैकी काही स्त्रियांची कथा आणि माहिती आपण पुढे प्रत्येक महिन्यात घेणार आहोत, 'आम्ही कृष्णसख्या' या लेखमालिकेतून.

**- सौ. ज्योत्स्ना शिंत्रे**

मोबा. ९९२००५८७०५

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे सभासद संपर्क अभियान

आपले संघाचे जवळपास १०२० आजीव सभासद आहेत. सुमारे ५८ वर्षांपासूनचे सभासद नोंदणी अर्ज संस्थेकडे उपलब्ध आहेत. पण कालानुरूप बदल झाल्याने त्यात अनेक संदर्भ, माहिती आवश्यक आहे. जेणे करून संघाला पुढील २५ वर्षांचे नियोजन करणे शक्य होईल. तसेच अनेक सभासद नोंदणी अर्ज जीर्ण झाल्याने त्याचे संकलन अवघड झाले होते पण, आपले हितचिंतक, मार्गदर्शक **श्री. प्रसाद खाडिलकर** यांनी त्याची जबाबदारी घेऊन ते अमेरिकेला गेले असता सर्व अर्जातील माहिती अद्ययावत सॉफ्टवेअरमध्ये पूर्णपणे भरून संस्थेला सर्व सभासद यादी परिपूर्ण करून दिली आहे. **हे सॉफ्टवेअर श्री. प्रसाद खाडिलकर यांनी संस्थेला विनामोबदला तयार करून दिले आहे, त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ त्यांचे सदैव ऋणी राहील.** ही सभासद यादी अद्ययावत करण्यासाठी आपण संघाचे कार्यालयात आपली माहिती आमचे प्रतिनिधींना देऊन सहकार्य करावे. नवी अद्यावत सभासद यादी तयार होण्यासाठी हे आपले सहकार्य अपेक्षित आहे. **- अध्यक्ष**

# नारी...

तू शब्द पेरत जातेस,
तू भावना जागवत जातेस,
तू जाणिवा जिवंत करतेस,
तू प्रतिभा फुलवत जातेस,
तू प्रतिमा रेखाटत जातेस,
तू आठवणींना उजाळा देत जातेस,
तू भविष्यातील संकल्पनांना दिशा देतेस,
तू वास्तवातील सत्यस्थिती दर्शवतेस,
तू स्वप्नांच्या दुनियेत नेतेस,
तू सुखाची व्याख्या सांगतेस,
तू दु:खावर फुंकर घालतेस,
तू अडचणीतुन मार्ग काढायला शिकवतेस,
तू अंधारातील शलाका बनतेस,
तू पथदर्शक वाटाडीही होतेस,
तू कधी रणरागिणी, कधी महिषासुरमर्दिनी,
कधी तेजस्विनी, कधी दामिनी, कधी मानिनी,
कधी शांती, कधी सावली, कधी सरिता,
कधी आशा, कधी दिशा,
कधी वर्षा, कधी सुखदा,
कधी आकांक्षा, कधी प्रतीक्षा,
कधी भक्ती, कधी स्फूर्ती,
कधी राधा, कधी मीरा, कधी कामिनी,
तर कधी स्वामिनी बनून वावरतेस,
प्रतिभेची, धैर्याची, संयमाची, प्रेमाची,
त्यागाची अनेक रूपे तू लीलया तुझ्यात
सामावतेस, सांग या साऱ्याची उजळणी
कधी करतेस?
तू तर सुर्यकन्या कालिंदी,
तू संपूर्ण स्वयंपूर्ण 'नारी' असतेस!

**- मंदार पानवलकर.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

# म्हणींचे म्हणणे

## अंगात नाय बळ अन् चिमटा काढून पळ

सद्या, नंद्या आणि बुध्या तिघेजण बाकीच्या मित्रांबरोबर गोट्यांचा डाव खेळत होते. खेळ अगदी मस्त रंगात आला होता. एक एक गोटी टिपत सद्याने सगळ्यांच्या गोट्या मैदानातून उचलून आपल्या खिशात घातल्या. प्रत्येक जण ५/६ रंगीत गोट्या घेऊन नवीन नवीन डाव मांडत होते. अन् सद्या ते सगळं आपल्या जवळ गोळा करत होता. बुध्याकडे शेवटच्च्या तीनच गोट्या हातात. नेम धरून एका गोटीने दुसऱ्या गोटीला टिपणार, इतक्यात नंद्या मधेच आला. त्याच्याकडच्या सगळ्या गोट्या पटपणाला लावून झाल्या होत्या. आता ही शेवटची रंगीत गोटी हरली तर? नंद्या खाली वाकला अन् मैदानावरच्या सद्याच्या रंगीत काळ्या सगळ्या गोट्या पटकन उचलल्या अन् जोरात पळायला लागला. झालं, बाकीच्या मित्रांनी त्याला गाठलं अन् अस्सा मार दिलाय, की ज्याचं नाव ते...

नंद्या घरी आला. आईनं त्याचा अवतार बघितला अन् बडबडायला लागली. काय करायला जातो, अन् काय करून येतो. आपल्याला खेळायला झेपत नाही तरी कशाला कडमडतोस रे? अरे ते दोघं तुझ्यापेक्षा जास्त हुशार आणि खेळात तरबेज आहेत हे जाणतोस ना तू? मग कशाला जावं? बरं खेळता येईल तेवढं समाधानाने खेळावं ते नाही!! हे म्हणजे अंगात नाही बळ आणि चिमटा काढून पळ...!!

नंद्या हे सगळं ऐकत होता. हिरमुसला होऊन म्हणाला, 'आई, कायपण बोलू नको. खेळत होतो मी नीट. पण सगळ्याच गोट्या त्या सद्याच्या खिशात काय म्हणून जाऊ देऊ? आणि मला खेळता येतच. खेळतोच मी पण नेम धरून, पण नेम चुकतो !' एवढं म्हणून त्याने जे भोकाड पसरले... ते सुरूच.. बाहेर खुर्चीत आजोबा बसले होते. ते हे सारं ऐकत होते. त्यांना एकीकडे हसू येत होतं तर दुसऱ्या बाजूला नातवाचा केविलवाणा चेहरा दिसत होता. ते नंद्याला हाक मारून म्हणाले, 'नंद्या, अरे पुरुषासारखा पुरुष तू. गळा काय काढतोस? जाऊन परत नवीन खेळ सुरू कर जा!' नंद्याने आईकडे बघितले. आईचे डोळे मोठे झाले होते. म्हणजे नको जायला. राहू दे. आई म्हणते तस्सच चिमटा काढून पळलोच आहे, तर राहू दे तसंच!

नंद्या हे खरतरं एक प्रातिनिधिक नावं झालं. आज समाजात असे अनेक सद्या, गोंद्या आहेत. ज्यांचे काम अगदी असेच असते. आपल्याला काय झेपतं, काय पेलवतं, काय सहन होतं याची जरा सुध्दा काळजी न करता रडीचा डाव खेळायचाच !

बोलण्यात येणाऱ्या अशा किती तरी छान छान म्हणी म्हणजे मराठी भाषेचा एक अनमोल ठेवा आहे. रोजच्या जगण्यात आपण अनेकदा आपल्याही नकळत अशा म्हणी वापरून जातो. खरतर गागर में सागर असा भावार्थ या म्हणी प्रकारात येतो. सांगायच काय असतं ते चार शब्दात मांडता येतं.

अंगात नाही बळ आणि चिमटा काढून पळ. गेयता असणारी ही शब्दरचना सरळ स्पष्ट शब्दांत अर्थ तर सांगतेच, पण लपलेला गूढ अर्थ सुध्दा व्यक्त होतो. मानवी स्वभाव असाच असतो. आपली तयारी आहे की नाही हे न बघता आपण वल्गना तरी किती करतो. अगदी विषय कुठलाही असो. राजकारण, समाजकारण, आर्थिक, सीमेवरचा म्हणजे विषयाला बंधन काहीच नसतं बर इथं. पण आपण साधी खोल सत्य परिस्थिती जाणून न घेता उगीच आहे त्यालाच उचकवत बसायचं बास!!

सद्या नंद्या बुध्या हे प्रतिकात्मक झाले आपल्या आपल्या समाजाचे. कारण यांच्यामुळेच तर विचारचक्र सुरू होतात. काय खरं ना?

**– वैदेही जोशी**

मोबा. ९५४५६३५४६५

# उंबरा

उंबरा म्हणजे लाकडी दाराच्या चौकटीत खालच्या बाजूस बसविलेले जाड, रुंद आणि सपाट लाकूड. दाह शमन करणारा आणि दीर्घकाळ पाण्यात टिकून रहाणारा वृक्ष म्हणजे (औदुंबराचा) उंबराचा वृक्ष. म्हणूनच पूर्वीच्या काळात घराचा उंबरा हा उंबराच्या खोडापासून बनत असे. या वृक्षाच्या नावावरूनच दाराच्या चौकटीत बसवायच्या या लाकडाचं नाव उंबरा असे पडले असावे. उंबराचा वृक्ष हा कृतिका नक्षत्राचा आराध्यवृक्ष आहे आणि त्याच्या औदुंबर या नावाने त्याला शुभ असे धार्मिक अधिष्ठानही प्राप्त झालेले आहे.

साक्षात दत्त निवास असलेला पवित्र वृक्ष म्हणून औदुंबराची ख्याती आहे. २१ गुणांनी परिपूर्ण औदुंबर वृक्षाखाली सद्गुरु माऊली दत्तांनी साधना केली. औदुंबराला भूतलावरील कल्पवृक्ष म्हणतात कारण प्रभू विष्णूंनी औदुंबराला आशीर्वाद दिला आहे की याला सदैव फळे येतील. तसेच या झाडाचे पूजन व भक्तीने सर्व मनोकामना पूर्ण होतील. या झाडाचे दर्शन केल्याने उग्रता शांत होते.

काही वर्षे पाठीमागे गेल्यास,घरातील गृहिणी रोज सकाळी उंबऱ्याची पूजा न चुकता करायची. उंबरठ्यावर नृसिंहलक्ष्मीचे स्थान असते. तर चौकटीवर गणेशाचे स्थान असते. घरात कोण, कसे,काय घेऊन जातेय त्यावर त्याचे ध्यान असते.

उंबरठा ! किती अर्थ होता त्या उंबरठ्याला. उंबरठा म्हणजे, दाराच्या चौकटीवर बसवलेली एक लाकडाची पट्टी, पण, किती अर्थ होता या लाकडी पट्टीला. चौकटी बाहेर पाऊल टाकायला पूर्वी कुणीही धजत नसे. सातच्या आत घरात हा पूर्वीच्या लोकांचा प्रघात होता. आता तर कुणी बाराच्या आतही घरात येत नाही. पूर्वी बायका म्हणायच्या की आमच्या उंबरठ्याचा गुण आहे, आमच्या घराचा उंबरठा ओलांडून लेक घरात आली की तिला आमचे गुण लागलेच म्हणून समजा. हाच उंबरठा प्रतिष्ठेचा प्रतिक मानला जायचा. ज्या घराला उंबरठा नाही ते काय घर म्हणावं का..? ज्या घराला उंबरठा नाही तेथे कुणाचाच पायपोस कुणाला नसतो असं म्हणतात. आओ जाओ घर तुम्हारा. सणवार आला की उंबरठा सारवला जायचा. त्याच्या आजूबाजूला सुबक अशी रांगोळी काढली जात असे. दारावर तोरण बांधले जायचे. तेच फ्लॅट संस्कृतीमध्ये लाकडी उंबरठा कालबाह्य झालाय. आता बैठकीच्या खोलीतूनच सगळे किचन दिसते. काहीच आडपडदा नको. कोणीही उपटसुंभ येतो व वहिनी वहिनी करत घरातच घुसतो. ना मानसन्मान ना मर्यादा ! किती सुधारलो ना आपण?

नववधू घराच्या उंबरठ्यावर ठेवलेले माप लांघत घरात प्रवेशते. उंबऱ्याला गृहित धरत आपण बरेचसे शुभ अशुभ संकेत मानतो. घरातल्या उंब-याच्या खूप साऱ्या भूमिका असल्या तरीही उंबरा असते एक मर्यादा. उंबरा असते एक सीमारेषा. उंबरा म्हणजे आपल्याला भानावर आणणारी नेमकी गोष्ट..

बाहेरून घरात येणाऱ्यांसाठी आपला इगो चपलांच्या सोबत बाहेर काढून ठेवायची जागा म्हणजे उंबरा. प्रवेशत असलेल्या घरातल्या चालीरीतींना मान देत आपण वागायचं आहे हे उंबऱ्याची वेस ओलांडतानाच मनात बिंबवून यायचं असतं. आणि घरातून बाहेर पडत असताना त्या घराने आपल्यावर केलेले संस्कार बाहेर पडल्यावरही आपण विसरणार नाही, हे लक्षात आणून देणारी जागा म्हणजे उंबरा.

उंबरा म्हणजे आत्मभान जागृत ठेवणारं स्थान. उंबऱ्याबाहेर पडल्याशिवाय जग काय आहे हे कळत नाही हे म्हणतात, ते अगदी खरं आहे. उंबरठे झिजवल्या शिवाय यश पदरात पडत नाही हे सुद्धा खरंच. पण उंबरठे झिजवताना आपल्यावर आपल्या

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

उंबऱ्याने केलेले संस्कार लक्षात ठेवले तर निसरड्या जागांचा सामना करणं सोपं होत असतं. अजून एक गोष्ट इथे नमूद करायलच हवी. ती म्हणजे उंबऱ्याच्या बाहेर पडण्यासाठी फार मोठं धैर्य लागतं आणि बाहेरच्या जगात वावरण्यासाठी मर्यादेचं फार मोठं भान लागतं. हे भान जे कोणी जपतं त्याचं आयुष्यात नेहमीच सुंदर होत असतं.

उंबरा म्हणजे लक्ष्मण रेषा. जे जे अपवित्र असेल, वाईट असेल, त्या वस्तू असतील, विचार असतील, त्यांना उंबऱ्याच्या आता थारा नाही. मग ते काहीही असू शकते. भ्रष्टाचाराचा पैसा असेल, कुलक्षणी मित्र असतील, व्यसनांसाठी लागणारे साहित्य असेल, वाईट विचार असतील त्यांना उंबऱ्याच्या आत स्थान नाही. म्हणूनच जे वाईट प्रवृत्तीचे कोणी आले, तर उंबऱ्याच्या बाहेरूनच निरोप दिला जायचा. म्हणून पुर्वीच्या घरांना ओसऱ्या असत. चहापाणी, गप्पा बाहेरच व्हायच्या. घरातील गृहलक्ष्मीला सुद्धा कधी बाहेर जायचे आणि कधी नाही हे, कोण आलंय याचे भान असायचे. आता काय भावोजी भावोजी करत असेल त्या अवतारात बाहेर ! घरातील संस्कार, ज्येष्ठांचे वर्तन, मुलांचे वळण हेच त्या घराचे व्यक्तिमत्त्व ठरवते. उंबरा म्हणजे मर्यादा. जशी नदीला दोन काठांची मर्यादा असते,सागराला किनाऱ्याची मर्यादा असते तसेच घराला उंबऱ्याची मर्यादा असते. ज्यावेळी नदी, सागर मर्यादा ओलांडतात तेव्हा जलप्रलय येतो. तसेच उंबऱ्याची मर्यादा ओलांडली की कुटुंबावर संकट ठरलेले आहे.

म्हणूनच आपण आपली संस्कृती जपली तर पुढील पिढी त्यातून आदर्श घेईल. एकुणच काय मर्यादा प्रभू श्रीरामांनी पाळली, आपण ती ध्यानात ठेऊ, उंबरा ओलांडताना मर्यादेचं भान ठेऊ.

**– केदार जोशी**

मोबा. ७५८८८३९५२७

**– बोडण सोहळा –**

**आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा !**

**यावर्षी संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा ५ मार्च व १९ मार्च २०२३ रोजी संस्थेचे 'रमा–दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करणेत येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ३५००/– इतका व एक जादा पान जेवण रु. २५०/– इतका येईल.**

**(एका बोडणास ४ सवाष्ण व १ कुमारिका )**

**संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पेठ, कोल्हापूर. फोन : ०२३१–२५४६२२५**

**श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ * सौ. संगीत आपटे : ८१४९५८००३४**

## सौ. मंजुश्री गोखले यांच्या 'समर्पण' या चरित्रात्मक कादंबरीस पुरस्कार प्राप्त




नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे ग्रंथालय सप्ताह व वार्षिक समारंभानिमित्त शनिवार, दि. ३१ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी विविध वाङ्मयीन पुरस्काराचा वितरण समारंभ संपन्न झाला. यामध्ये 'नवस्नेह' च्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांच्या 'समर्पण' या चरित्रात्मक कादंबरीला 'अशोक देवदत्त टिळक पुरस्कार' प्राप्त झाला. त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघ परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

– अध्यक्ष

# आरोग्यम् धनसंपदा

**सोयाबीन, हुलगा, वाल, वाटणे, हरबरा याविषयी आरोग्यदायी माहिती.....**

**सोयाबीन**

- जर आपणास काही मानसीक अजार असेल तर आपल्या अहारात सोयाबीनचा जरूर समावेश करा. सोयाबीन मानसीक संतूलनावर प्रचंड प्रभावी असते.
- हृदयाच्या आजारवरही सोयाबीन फायदेशीर असते. हृदयाचा आजार असणाऱ्या लोकांनी सोयाबीनचा वापर अहारात करावा असा सल्ला डॉक्टरही देतात.
- उच्च रक्तदाबावरही सोयाबीन फायदेशीर ठरते. जे लोक सोयाबीनचे नियमीतपणे सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सोयाबीनपासून बनवलेले ताक प्यायल्याने पोटांचे विकार कमी होतात.

**हुलगा / कुळीथ**

- कुळीथास हुलगे असेही म्हणतात.
- शरीरातील मेद कमी करण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो.
- अंगाला खूप घाम येत असल्यास त्यावर भाजलेल्या कुळीथाचे पिठाचे उद्वर्तन (उटणे) लावल्याने खूप चांगला उपयोग होतो.
- मूतखडा असल्यास इतर आयुर्वेदिक औषधांबरोबरच कुळीथाचा वापर करावा. त्याचे सूप मूतखड्यामध्ये होणारी पोटातली वेदना कमी करण्यासाठी वापरतात.
- पोटात वात धरणे, पोट दुखणे, फुगल्यासारखे वाटणे यावर कुळीथाचा चांगला उपयोग होतो.
- पोटातील जंतांवरही याचा उपयोग होतो.
- खोकला, सर्दी, कफ यावर कुळीथाचा वापर करावा.

**वाल**

- वाल वायुकारक असते त्यामुळे त्याच्याबरोबर तेल घेणे आवश्यक आहे.
- वाल आणि वालपापडीस 'वातुळ विष' समजले जाते; पण त्याच्या स्वादामुळे ते सर्वांचे आवडते कडधान्य आहे.
- वालमध्ये प्रोटीन कॅल्शियम, फॉस्फरस, सोडियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, गंधक व लोह असते. तसेच त्यात जीवनसत्व 'ए' जास्त प्रमाणात असते तर 'सी' हे अत्यल्प असते.
- वाल मधुर, रूक्ष, आंबट, जड व तुरट असते.
- तसेच ते पोट साफ करणारे, पित्त, रक्त, मूत्र व वायुकारक असतात. तसेच ते मातेच्या अंगावरील दुधास पोषक असतात.

**वाटाणे**

- वाटाण्याचे सूप हा एक सर्वोत्तम आहार आहे.
- वाटाणे सुकल्यानंतर त्यातील 'सी' जीवनसत्व कमी होते त्यामुळे शक्यतो ओल्या वाटाण्यांचा उपयोग करणे उत्तम आहे.
- वाटाणे मधुर, रूक्ष व थंड असतात.
- ते मल बांधून आणणारे व पित्त व कफनाशक असतात.

**हरभरा**

- हरभरा थंड रूक्ष हलका व तुरट असतो.
- त्याच्या शौच रोखणे वायुकारक व पित्तनाशक, रक्तविकार, कफ व ताप दूर करण्यासाठी उपयोग होतो.
- रात्री पाणी न पिता थोडे भाजलेले चणे खाऊन झोपल्याने खोकला कमी होतो.
- रात्री थोडे भाजलेले चणे खाऊन त्यावर गरम पाणी पिल्याने बसलेला आवाज मोकळा होतो.
- सुरेल आवाजासाठी गुळ व चणे उपयुक्त आहे.
- गरमागरम फुटाणे खाल्याने मुळव्याध्यामधून स्त्रवणारे रक्त बंद होते.

**सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामया।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद दुःख भागभवेत्।।**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय २ : सांख्ययोग**

**श्रीभगवानुवाच ।**

**जळ संपूर्ण समुद्री जाण ।**
**त्यांत उदके जाती मिळोन ।**
**तैशा सकळ कामना होती लीन ।**
**तो शांति पावे नि:कामना विरहित होये ।।७०।।**

न भंग पावे भरतां हि नित्य ।
समुद्र घेतो जिरवूनि पाणी ।।
ज़ाती तसे ज्यांत जिरूनि भोग ।
तो पावला शांति न भोग–लुब्ध ।।७०।।

**सर्व काम सांडुंनी । जो पुरुष वर्ते निस्पृह होउनी ।**
**तो मोहो अहंकार त्यजुनी । शांति पावे ।।७१।।**

सोडूनि कामना सर्व फिरे होऊनि नि:स्पृह ।
अहंता ममता गेली झाला तो शांति–रूप चि ।।७१।।

**ऐसिया ब्रह्मस्थिति वर्तति ।**
**ते मोहरूप संसार न पावती ।**
**देह त्याग समयी वस्तु स्मृती ।**
**ते पावती पूर्णब्रह्म ।।७२।।**

अर्जुना स्थिती ही ब्राह्मी पावतां न चळे पुन्हां ।
टिकूनि अंत–काळीं हि ब्रह्म–निर्वाण मेळवी ।।७२।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्याय: ।।१।।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

---

**अध्याय ३ : कर्मयोग**

**अर्जुन उवाच ।**

**अर्जुन म्हणे श्रीकृष्णनाथा ।**
**कर्माहुनि ज्ञान श्रेष्ठ असतां ।**
**तरि मज अघोर कर्मी कां अनंता ।**
**प्रवर्तावितोसी ।।१।।**

बुद्धि कर्माहुनी थोर मानिसी तूं जनार्दना ।
मग कर्मांत कां घोर घालिसी मज़ केशवा ।।१।।

**मिश्रिते वाक्यें येणें ।**
**भुलविसी माझें अंत:करण ।**
**तरि निश्चित सांग मनें ।**
**जेणें श्रेय पाविजेल ।।२।।**

मिश्र बोलूनि बुद्धीस ज़णू मोहांत टाकिसी ।
ज्यानें मी श्रेय पावेन सांग तें एक निश्चित ।।२।।

**श्रीभगवानुवाच ।**

**लोकांमाजी द्विधा निष्ठता ।**
**त्यापूर्वी सांगितल्या भारता ।**
**सांख्यमति ज्ञान ज्ञाता ।**
**योगियासी कर्मयोग बोलिजे ।।३।।**

दुहेरी ह्या जगीं निष्ठा पूर्वीं मी बोलिलों असें ।
ज्ञानानें सांख्य जी पावे योगी कर्म करूनियां ।।३।।

## शब्दकोडे माहे फेब्रुवारी २०२३

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | X | ३ | | ४ | ५ |
| ६ | | | | X | ७ | |
| ८ | | X | ९ | १० | X | |
| X | ११ | १२ | | | | |
| १३ | X | | X | | X | १४ |
| १५ | १६ | | १७ | X | १८ | |
| X | | X | १९ | | | |

**आडवे शब्द :**

१. चाकर, नोकर, सेवक, ३. कारण नसताना, विनाकारण, ६. धाक, दरारा, जरब, ७. 'जीभ' या ज्ञानेंद्रियांची संवेदना, ८. एका मद्याचे नाव, ९. प्रवासी वाहतुकीचे साधन, ११. गरम मसाल्यातील एक पान, १५. खा-खा, खाण्याची अनावर इच्छा, १८. थर्मामीटरमध्ये वापरला जाणारा धातू, १९. छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी मातेने दिलेले शस्त्र

**उभे शब्द :**

१. जिना, शिडी, मुंबईतील महत्त्वाचे रेल्वे स्थानक, २. दुसऱ्याच्या मताशी आपले मत जुळणे, ३. अगतिक, निरुपाय, ४. नृत्य, नर्तन, ५. कृत्रिम दंतपक्ती, ९. शक्ती, १०. अळणी, बेचव, पचपचीत, १२. माणूस, मनुष्य, १३. संसार, १४. पळून गेलेला, १६. दूध आटवून केलेला घट्ट पदार्थ, मावा, १७. 'पत्र' ला हिंदी प्रतिशब्द, १८. अलगूज, बासरी

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. संत चोखामेळा यांच्या पत्नीचे नाव काय होते?
२. लावणीसम्राज्ञी कै. सुलोचना चव्हाण यांना 'लावणीसम्राज्ञी' हा किताब कोणी दिला?
३. 'लपंडाव' खेळाला फ्रान्समध्ये काय म्हणतात?
४. ऑस्ट्रेलिया देशाच्या राजधानीचे नाव काय?
५. भारताचा राष्ट्रीय वृक्ष कोणता आहे?
६. जगातील सर्वात उंच धबधब्याचे नाव काय आहे? तो कुठे आहे?
७. कवी 'ग्रेस' यांचे पूर्ण नाव काय?
८. डेन्मार्क देशाचे चलन काय आहे?
९. 'मैं तुलसी तेरे आँगन की' हा हिंदी चित्रपट कादंबरीकार चंद्रकांत काकोडकर यांच्या कोणत्या कादंबरीवर आधारित आहे?
१०. गानसम्राज्ञी कै. लता मंगेशकर यांचे वडील मा. दिनानाथ त्यांना कोणत्या लाडाच्या खास नावाने हाक मारत?

(उत्तरे अन्यत्र पहा.) **– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## शब्दकोडे माहे जानेवारीचे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ आ | २ ला | ३ प | X | ४ भा | ५ ग | X | ६ घा |
| ७ व | रा | त | X | ८ तु | ण | ९ तु | णे |
| श्य | X | १० न | ११ म | क | X | १२ का | क |
| १३ क | १४ वी | X | १५ स | ली | १६ म | X | र |
| १७ ता | रां | ग | ण | X | १८ न | थ | X |
| X | ग | X | १९ व | री | स | X | २० दी |
| २१ ब | ना | २२ व | ट | X | २३ ब | हा | वा |
| द | X | डी | X | २४ स | दा | X | न |
| २५ न | र | X | २६ श | री | र | X | गी |

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक विसावा)

जेवणं झाली तेव्हा दुपार उलटून गेली होती. मुक्ता आणि सोपान आपडी-थापडी खेळत होते. खेळताना मुक्ता सतत चुकत होती आणि हरत होती. शेवटी-शेवटी तिला रडू यायला लागलं. मग सोपानानं खेळ बदलला. अंगठ्याच्या घोड्याला पाणी घालायचा खेळ सुरू झाला. निवृत्ती-ज्ञानेश्वर बाहेर गेले होते. दिवस मावळला, तसे ते परत आले. तोपर्यंत या दोघांचा घोड्याला पाणी घालायचा खेळ सुरू होता. अचानक मुक्तानं विचारलं, ''दादा, वाळवंटात घोड्याला कोण पाणी पाजत असेल? तिथं पाणी कुठून आणणार?'' सोपानानं तत्परतेनं उत्तर दिलं ''अगं, वाळवंटात काही ठिकाणी पाणी असतं, मृगजळ म्हणतात त्याला !'' सोपानाच्या या उत्तराने मुक्तीचं समाधान झालं नाही. तिनं पुन्हा विचारलं, ''दादा, आपल्या गंगेच्या वाळवंटात कितीतरी पाणी आहे !'' तिचं बोलणं ऐकून सोपानाला नवल वाटलं. हिनं कधी वाळवंटातलं पाणी बघितलं?'' ''तुला काय माहीत गं नकटे, गंगेच्या वाळवंटाखाली पाणी आहे ते?'' सोपानाने विचारलं. ''मी ना त्या दिवशी... त्या दिवशी आईला शोधायला गंगेच्या घाटावर गेले होते. तेव्हा... तेव्हा मी... मी, मला आईच्या बांगड्या जिथं सापडल्या तिथं मी उकरून बघितलं तर... तर मला खाली पाणी दिसलं; पण... पण आई तिथं नव्हतीच. निवृत्तीदादा, ज्ञानादादा, आई-बाबांना कोण पाणी देत असेल?'' बोलता-बोलता, सांगता-सांगता मुक्ती रडवेली झाली. तिच्या त्या सांगण्यानं, त्या बोलण्यानं तिथं क्षणभर स्मशानशांतता पसरली. कुणीच काही बोललं नाही.

ना कुणी तिच्या प्रश्नाला उत्तर दिलं; पण तिच्या त्या प्रश्नानं ज्ञानेश्वराच्या मनाचा एक कोपरा लख्ख उजळून निघाला. स्वत:शीच बोलावं त्याप्रमाणे तो बोलू लागला, ''खरं आहे मुक्ता तुझं. अगदी योग्य प्रश्न विचारलास. दादा, आई-बाबांना जाऊन आज नऊ दिवस झाले. उद्या दहावा. आपण त्यांची तीन-तीन मुलं. आपल्या आई-वडिलांचं श्राद्ध आपण करायला नको? त्यांचा दशपिंड विधी करायला नको? त्यांना पाणी घालायला नको?'' ज्ञानेश्वराचं बोलणं ऐकून सोपानाचं डोळे भरून आले, तर निवृत्ती गंभीर झाला. ''तू म्हणतोस ते खरं आहे ज्ञानेशा; पण आपण बहिष्कृत आहोत. आपल्यावर अजून उपनयन संस्कार झालेले नाहीत. मग असं असताना आई-वडिलांचा दशक्रिया विधी करण्याचा अधिकार आपल्याला आहे का, हे आधी पाहिलं पाहिजे. धर्मसभेला विचारलं पाहिजे. त्यांनी परवानगी दिली, तर आपण दशपिंडदान करू शकू,'' निवृत्तीनं मार्ग सांगितला.

''कोणती धर्मसभा दादा? चार अश्राप बालकांना पोरकं करून आई-वडिलांना देहान्त प्रायश्चित्त घ्यायला सांगते, ते धर्मसभा? ज्यांच्या ज्ञानाला आव्हान नव्हतं, असे प्रकांडपंडित असलेल्या आपल्या वडिलांना धर्माचं ज्ञान शिकवण्याचं ढोंग करते, ती धर्मसभा? आई-बाबांनी देहान्त प्रायश्चित्त घेतल्यावरही आपल्यावरचा बहिष्कार चालूच ठेवते, ती धर्मसभा? की धर्माच्या नावाखाली अधर्म करताहेत, ती धर्मसभा? सांग ना दादा, कोणती धर्मसभा? आणि समज या धर्मसभेनं आपल्याला आई-बाबांच्या दशपिंड विधीचा अधिकार नाही, असं सांगितलं, तर त्या दोन पुण्यात्म्यांना काय तसंच तडफडत ठेवायचं? धर्मसभेच्या संमत्या, परवानग्या तू आणत बस. मी उद्या गंगेच्या घाटावर आई-बाबांची दशक्रिया करणार आहे. मला गरज नाही धर्मसभेच्या परवानगीची !'' ज्ञानेश्वर बोलत असताना त्याचा चेहरा संतापानं लाल झाला होता. डोळ्यांतून स्फुल्लिंग बाहेर पडत होती. कपाळावरची शीर टरारली होती. इतके दिवस आवरून ठेवलेला धर्मसभेबद्दलचा संताप आता

उफाळून आला होता. त्याच्या या रूपाकडे सोपान-मुक्ता बघतच राहिले. निवृत्तीलाही काय बोलावं सुचेना; पण यातून सावरला तो सोपानंच. त्यानं पुढे होऊन ज्ञानेश्वराच्या खांद्यावर हात ठेवला. तप्त सूर्याला शिवावं तसं झालं त्याला. पण आपल्या शीतल हातानं तो ज्ञानेश्वराच्या खांद्यावर थोपटत राहिला, म्हणाला, ''निवृत्तीदादा, ज्ञानेश्वरदादा म्हणतोय ते बरोबर आहे. धर्मसभेनं परवानगी दिली काय किंवा नाही दिली काय, आपण आई-बाबांचा दशक्रिया विधी तर करणारच आहोत ना? मग धर्मसभेला विचारायचं कारणच काय? विचारायला जायचं, म्हणजे दगड मारून माश्यांचं मोहोळ उठवायचं, असं होणार आहे. आपण कावेरीअक्कांना विचारून शिधा जमवू आणि उद्या दशपिंडी श्राद्ध करू. धर्मसभेला विचारायला गेलो, तर अपमानाशिवाय पदरी काही पडणार नाही?'' सोपानाचं शांत बोलणं निवृत्तीला पटलं. ''बरोबर आहे तुमचं ! आपण धर्मसभेला विचारायला नकोच. करून घेऊ उद्या दशपिंड क्रिया. मी फक्त एवढ्यासाठीच म्हणालो होतो की, पुन्हा नवीन काही धर्मकायदे काढून ब्रह्मवृंदानं आपल्याला त्रास देऊ नये !'' निवृत्तीनं संमती दर्शवली. तरी अजून ज्ञानेश्वर रागावलेलाच होता. ते बघून पुन्हा निवृत्ती म्हणाला, ''ज्ञानेशा, सोड रे राग आता. अरे धर्माचे कायदे काय काय आहेत, हे धर्मसभेलाच माहीत आहे, म्हणून मी म्हणत होतो. जाऊ दे ! आता शांत हो बरं !'' निवृत्तीनं ज्ञानेशाच्या मस्तकावर थोपटलं. त्याचा आपल्या मस्तकावरचा हात काढून तो आपल्या हातात धरून ज्ञानेश्वर म्हणाला, ''दादा, तुमचा आशीर्वाद जर माझ्या पाठी असेल, आणि तुमचा हात जर असाच माझ्या मस्तकी असेल तर... तर एक दिवस असा येईल, की धर्म म्हणजे काय? धर्माचे कायदे काय असतात, हे यांना माझ्याकडून शिकावं लागेल. नव्हे ते मीच शिकवेन !''

''तथास्तु !'' सोपान आणि निवृत्ती दोघंही एकदम उद्गारले. मुक्तीनं समोर पाहिलं. अस्ताचलाला जाणारा सूर्य क्षणभर थांबला होता. तोही जणू थांबून 'तथास्तु' म्हणाला आणि मगच मावळला. 'तथास्तु'चा प्रतिध्वनी साऱ्या चराचरात जणू घुमत होता आणि तो एकट्या मुक्तीला ऐकायला येत होता. तिला एकटीलाच. (क्रमशः)


**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

**दिनविशेष (फेब्रुवारी २०२३)**
**माघ - फाल्गुन शके १९४४**
**प्लवनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**बुधवार दि. १ :** जया एकादशी, **गुरुवार दि. २ :** गोंदवलेकर महाराज जयंती, **शुक्रवार दि. ३ :** विश्वकर्मा जयंती, **शनिवार दि. ४ :** पौर्णिमा, **सोमवार दि. ६ :** गुरुप्रतिपदा, **गुरुवार दि. ९ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.३१), **शनिवार दि. ११ :** औदुंबर पंचमी, श्रीकृष्ण सरस्वती महाराज जयंती, **रविवार दि. १२ :** जोतिबा खेटे सुरू, **सोमवार दि. १३ :** गजानन महाराज प्रकट दिन, **बुधवार दि. १५ :** रामदास नवमी, **शनिवार दि. १८ :** महाशिवरात्री, संत गाडगेबाबा जयंती, **रविवार दि. १९ :** छ.शिवाजी महाराज जयंती, अमावास्या, **शुक्रवार दि. २४ :** जागतिक मुद्रण दिन, **रविवार दि. २६ :** स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यदिन, **सोमवार दि. २७ :** मराठी राजभाषा दिन, **मंगळवार दि. २८ :** राष्ट्रीय विज्ञान दिन.

# भारतीय राज्यघटना - एक सामाजिक करार

आपल्या राज्यघटनेद्वारे आपण आपल्या राज्यशासनाला काही अधिकार दिलेले आहेत. उदाहरणार्थ आमच्याकडून म्हणजे सर्व जनतेकडून कर वसूल करणे, पोलीस दल आणि इतर यंत्रणामार्फत दमन शक्ती आणि दंडशक्ती वापरणे, काही वेळा आम्हाला तुरुंगात टाकणे, क्वचित प्रसंगी आम्हाला फाशीची शिक्षा देणे, आमची मालमत्ता जप्त करणे वगैरे. या शासनाला दिलेल्या अधिकारांच्या बदल्यात आम्हाला शासनाकडून काही गोष्टी अपेक्षित असतात. उदाहरणार्थ आम्हाला परस्परांपासून संरक्षण देणे म्हणजेच अंतर्गत सुरक्षा, परचक्रापासून संरक्षण देणे, रानटी पशु आणि नैसर्गिक दुर्घटना यांच्यापासून आम्हाला काही प्रमाणात सुरक्षा देणे, सार्वजनिक वाहतुकीच्या सोयी निर्माण करणे. ज्या प्रमाणात समाजाची आर्थिक स्थिती सुधारेल आणि त्यामुळे शासनाला जास्त कर मिळून शासनाची देखील आर्थिक स्थिती सुधारेल, त्यावेळी याच्यामध्ये अनेक इतर कर्तव्यांची देखील भर पडू लागते. उदाहरणार्थ सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, सार्वजनिक शिक्षण व्यवस्था, बेरोजगार भत्ता, विविध कारणांनी अपंग झालेल्या लोकांसाठी विविध प्रकारे मदत देणे, वृद्ध लोकांची काळजी आणि त्यांच्यासाठी पेन्शन व्यवस्था, वगैरे वगैरे.

इतिहास पूर्व काळामध्ये देखील माणूस कधीही एकटा दुकटा किंवा एकटे कुटुंब म्हणून राहत नसावा. तो एकटा म्हणून फार दुर्बळ होता आणि त्यामुळे माणसाला किंवा कुटुंबाला फार काळ एकटे जगणे अशक्यच असावे. त्यामुळे मानव जातीच्या उगमापासूनच तो टोळ्या करून राहत होता. टोळी मध्ये राहण्यामध्ये त्याला शिकार करण्यात जास्त यश आणि जास्त सुरक्षितता मिळत होती. तसेच इतर शत्रुत्व करणाऱ्या टोळ्यांपासून बऱ्यापैकी संरक्षण देखील मिळत असे. अर्थात टोळीमध्ये राहण्यामध्ये त्याला आपले स्वातंत्र्य काही प्रमाणात गमवावे लागत असे आणि टोळीचे जे काही नियम असतील ते पाळावे लागत असतील आणि टोळीच्या प्रमुखांच्या आज्ञा देखील मानाव्या लागत असतील. हा एक प्रकारचा अलिखित आणि कदाचित निश्चित स्वरूपात बोलला देखील न गेलेला सामाजिक करारच म्हणता येईल. जसजशी मानवांची संख्या वाढू लागली तसतशा टोळ्या मोठ्या होऊ लागल्या, काही टोळ्यांचे समूह तयार होऊ लागले, भटक्या टोळ्यांच्या ऐवजी स्थिर वस्त्या किंवा खेडेगावे निर्माण झाली आणि मग टोळी प्रमुखाची जागा स्थानिक सरदार किंवा अनेक सरदारांचा प्रमुख असा राजा आणि नंतर कदाचित अनेक राजांचा प्रमुख असा सम्राट यांनी घेतली असावी. या सर्व प्रवासामध्ये राजे लोकांची ताकद अवास्तव वाढत गेली आणि तुलनेने जनतेची ताकद खूपच कमी पडू लागली. त्यामुळे अनेक राजे जुलमी निघू लागले आणि प्रजेवर अन्याय करू लागले. नशिबाने किंवा अपघातानेच एखादा राजा हा जनतेचा पित्रुवत सांभाळ करणारा निघत असे. त्यात धर्मसत्ता आणि राजसत्ता एकवटली तर जनतेला फार मोठ्या प्रमाणावर अन्याय सहन करावा लागे आणि अजूनही लागतो, हे इराण मधील हिजाब सक्ती विरोधी आंदोलन चिरडून टाकण्यासाठी तेथील शासनाने शेकडो नागरिकांची हत्या करून आणि हजारोंना अटक करून सिद्ध केले आहे. पूर्वीच्या काळी राजे लोकांमध्ये सतत चालू असलेल्या अनेक युद्धांमुळे प्रजेचे फारच हाल होत असत आणि अन्याय सहन करावा लागे आणि हिंसेलाही तोंड द्यावे लागे. (आज सुद्धा रशियाने (पुतिनने) सुरू केलेल्या युद्धाने सर्व जगाचे नुकसान होत आहे.)

अशा परिस्थितीत राजाच्या अनिर्बंध सत्तेवर काही बंधने आणण्याचे पहिले पाऊल सन १२१५ मध्ये इंग्लंडचा जुलमी राजा जॉन आणि त्याच्या विरुद्ध असलेले २५ सरदार (ब्यारन) यांच्यामध्ये झालेल्या मॅग्ना कार्टा (स्वातंत्र्याचा महान करार) ने उचलले. या कराराने सरदारांना बेकायदेशीरपणे तुरुंगात टाकणे, अवाजवी कर भरायला लागणे यापासून संरक्षण मिळाले आणि जलद न्याय मिळण्याची सोय झाली. सामाजिक कराराची ही एक प्रकारची सुरुवात म्हणावी लागेल. सुरुवातीला फक्त सरदारांना संरक्षण देणारी ही करार योजना हळूहळू सर्व जनतेला संरक्षण देण्यापर्यंत विस्तारित झाली, आणि राजाच्या ऐवजी कोणतीही पण विशेषतः लोकशाही शासन पद्धती काम निभावू लागली.

यावरून हे लक्षात येईल की सामाजिक कराराचे किंवा आपल्या भारतीय घटनेचे कदाचित सर्वात महत्त्वाचे काम हेच आहे की शासन व्यवस्थेच्या अतिरेकी सत्ता ग्रहणापासून, आणि त्यामुळे ती करत असलेल्या अन्यायांपासून सामान्य जनतेचे संरक्षण करणे! शासन व्यवस्था विरुद्ध सामान्य जनता असा हा असमान लढा पुरातन कालापासून चालू आहे आणि घटना त्यामध्ये जनतेच्या बाजूने उभी आहे. जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींनी चालवलेले राज्य म्हणजेच लोकशाही. पण लोकशाहीचे अवनतीकरण हुकूमशाहीमध्ये, अन्यायी राजवटीमध्ये झाल्याचे आपण पूर्वी पाहिले आहे आणि आज देखील पाहत आहोत. अशावेळी लोकशाहीचा खंदा संरक्षक म्हणून काम करणे ही घटनेची जबाबदारी आहे. अर्थात हे काम जनतेचे असल्याकारणाने जनतेने जागरूक राहून घटना राबवली पाहिजे आणि त्या कामामध्ये न्यायालय पत्रकारिता आणि निवडणूक आयोग, मानवाधिकार आयोग अशा स्वायत्त आणि शासनावर अवलंबून नसलेल्या संस्थांची मदत घेतली पाहिजे. गेल्या ७२ वर्षात आलेल्या अनुभवावरून आणि बदलत्या परिस्थितीनुसार घटनेमध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील जनतेने अभ्यासपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

**घटनेची उद्देशिका**

- सामाजिक आर्थिक आणि राजनैतिक न्याय
- विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची आणि संधीची समानता
- व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता

हे उद्देश असलेले, सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य प्रस्थापित करण्यासाठी ही घटना भारतीय जनतेने मान्य करून स्वतःलाच अर्पण केलेली आहे.

**भारतीय राज्यघटनेत आवश्यक असलेल्या सुधारणा किंवा दुरुस्त्या :**

गेल्या ७२ वर्षांच्या अनुभवावरून भारतीय राज्यघटना ही राज्यघटनेचे वर नोंदवलेले जे उद्देश आहेत ते उद्देश पार पाडण्यामध्ये कुठे कमी पडते हे लक्षात आले आहे. त्यानुसार आणि काही नवीनच निर्माण झालेल्या परिस्थितीला आणि धोक्यांना तोंड देण्यासाठी, राज्यघटनेमध्ये कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे याची एक यादी करता येईल. ती अशी:

१. माझ्या मते आपल्या राज्यपद्धतीचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य काय असेल तर ते म्हणजे ती एक लोकशाही आहे. ही लोकशाही अधिक चांगली आणि अधिक मजबूत होण्याच्या दृष्टीने काही सुधारणा आवश्यक आहेत. त्या नोंदवण्यापूर्वी चांगल्या लोकशाहीचे काही निकष पाहू.

(अ) प्रत्येक मतदाराच्या मताची किंमत सारखीच असली पाहिजे. (ब) अध्यक्षीय पद्धतीपेक्षा पार्लमेंटरी पद्धत अधिक चांगली. (क) स्वायत्त न्यायालयाला कायदेमंडळाने केलेल्या सर्व कायद्यांचे परीक्षण करता यायला हवे. (ड) मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ हे कायदेमंडळापेक्षा जास्त मजबूत आणि ताकदवान असता कामा नयेत. (इ) राज्यघटनेमध्ये बदल करणे बरेच अवघड असले पाहिजे. (ई) स्वायत्त मध्यवर्ती बँक आणि स्वायत्त निवडणूक कमिशन. (उ) सत्तेवरील राजकीय पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यामधील संबंध सहमतीचे असावेत, शत्रुत्वाचे असू नयेत. त्या दृष्टीने एकाच पक्षास बहुमत मिळण्याच्या ऐवजी पक्षांच्या युतीलाच शक्यतो बहुमत मिळावे. (ऊ) निवडणुकांसाठी येणारा खर्च उमेदवारांसाठी आणि राजकीय पक्षांसाठी देखील किमान असावा. प्रचंड निवडणूक खर्च करावा लागल्यास त्यामुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर वाढतो.

आता आपली लोकशाही अधिक सुदृढ आणि चांगली होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सुधारणा पाहू :

**१.१. निवडणूक पद्धतीमध्ये सुधारणा.**

गंमत म्हणजे आपल्या राज्यघटनेमध्ये कायदेमंडळांच्या निवडणुकांविषयी काहीही सांगितलेले नाही. घटना मंजूर झाल्यानंतर केलेल्या representation of India act. या कायद्यांच्या अनुसार आपली सध्याची फर्स्ट पास्ट पोस्ट किंवा साध्या बहुमताची निवडणूक पद्धत स्वीकारण्यात आली. ही निवडणूक पद्धत मागासलेली असून त्याचे आजपर्यंत अनेक परिणाम आपण सोसलेले आहेत. उदाहरणार्थ निवडणूक खर्च खूप वाढल्यामुळे राजकीय पक्षांना भ्रष्टाचार करावाच लागतो, राजकीय पक्षांचे

तिकीट मिळवण्यासाठी उमेदवार शक्यतो दशकोट्याधीश असावा लागतो, तो गुन्हेगार आणि भ्रष्टाचारी असला तरी चालतो, निवडणुकीत पक्षाला मिळालेली मते आणि त्यापक्षाला मिळालेल्या कायदेमंडळातील जागा यांच्यामध्ये काही प्रमाणबद्धता राहात नाही, निवडणुकीत तीस-पस्तीस टक्के मिळवून अल्पमतात असलेल्या पक्षाला देखील कायदेमंडळामध्ये पूर्ण निर्णायक बहुमत मिळू शकते, निवडणुकीत त्यातल्या त्यात अल्पमतात असणाऱ्या पक्षांना मतांच्या मानाने फारच कमी जागा मिळतात, राज्यकारभार करण्याची अर्हता असणारी सज्जन माणसे निवडणुकीसाठी उभे राहण्याचे देखील धाडस करत नाहीत, निवडून आलेल्या राजकीय पक्षांमध्ये सहकार्य न होता, शत्रुत्वाचे संबंध निर्माण होतात. त्यामुळे ही निवडणुक पद्धत आपण सोडून देऊन त्या ऐवजी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धत स्वीकारली पाहिजे. या पद्धतीमध्ये मतदार संघ हे बहू सदस्य असून एका मतदारसंघामार्फत अनेक प्रतिनिधी निवडून येतात. प्रत्येक पक्ष या मतदारसंघासाठी आपल्या उमेदवारांची यादी निवडणुकीपूर्वीच प्रसिद्ध करतो आणि मतदार या यादीलाच मते देतात. जितक्या जागा असतील तितकी मते प्रत्येक मतदाराला असतात. प्रत्येक पक्ष- यादीला जितकी मते मिळतील त्या प्रमाणात त्या यादीतील उमेदवार क्रमानुसारच निवडून आले असे जाहीर करण्यात येते. उदाहरणार्थ दहा जागांचा मतदार संघ असेल आणि शंभर मतदार असतील, तर झालेल्या १००० मतदानापैकी अ ब क ड या पक्षांना अनुक्रमे ४००, ३००, २०० आणि १०० अशी मते मिळाली तर त्यांना अनुक्रमे चार, तीन, दोन आणि एक अशा जागा कायदेमंडळात मिळतील. आणि त्या जागा प्रसिद्ध केलेल्या यादीतील अनुक्रमाप्रमाणेच द्याव्या लागतील. यादीतील सर्व उमेदवारांना कोणत्याही रीतीने वैयक्तिक खर्च किंवा प्रचार करण्याची आवश्यकता राहणार नाही. मतदार संघाची संख्या कमी झाल्याकारणाने पक्षाला देखील प्रचारासाठी येणारा खर्च खूपच कमी येतो. निवडून आलेल्या सदस्यांपैकी कोणाचीही मृत्यू, आजार, गुन्हेगारी वगैरे कोणत्याही कारणाने कायदेमंडळातील जागा रिक्त झाल्यास त्या जागेवर पक्षाच्या मूळ यादीतील नंतरच्या क्रमांकावर असलेल्या उमेदवाराला ती जागा मिळते आणि त्यामुळे पोटनिवडणूक घ्यावी लागत नाही. या पद्धतीमध्ये बहुतेक वेळा कोणत्याही पक्षाला कायदेमंडळामध्ये पूर्ण बहुमत मिळत नाही आणि त्यामुळे कोणत्या ना कोणत्या तरी पक्षाबरोबर निवडणूक पूर्व किंवा निवडणुकीनंतरची युती करावी लागते. दर खेपेला अशी युती करावीच लागल्यामुळे अन्य पक्षांच्या बरोबरचे संबंध सुधारतात आणि सहमतीचे राजकारण निर्माण होते. कायदेमंडळामध्ये कार्यकारी मंडळ किंवा मंत्रिमंडळ बनवणाऱ्या पक्षाविषयी किंवा युती विषयी अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यास, कायदे मंडळाच्या त्याच बैठकीमध्ये अन्य कोणत्या ना कोणत्या पक्षाबद्दल किंवा युतीबद्दल विश्वासाचा ठराव मंजूर झाल्याशिवाय पहिला अविश्वासाचा ठराव प्रत्यक्षात येऊ शकत नाही. त्यामुळे मंत्रिमंडळ पडले तरी कायदेमंडळ चालूच राहते आणि ते आपला चार किंवा पाच वर्षाचा ठरीव कार्यकाल पूर्ण करते. चालू मंत्रिमंडळ पडले तरी नवी युती तयार होऊन नवे मंत्रिमंडळ सत्तेवर येते. मध्यावधी निवडणुका होत नाहीत. सध्या देशात कोठे ना कोठे तरी सतत पोटनिवडणुका किंवा मध्यावधी निवडणुका चालू असल्यामुळे राज्यकारभारामध्ये निर्माण होणारे अडथळे या निवडणूक पद्धतीमध्ये संभवत नाहीत.

आपली सध्याची निवडणूक पद्धती घटनेमध्ये नमूद केलेली नसल्यामुळे आणि संसदेच्या साध्या कायद्यामुळे अस्तित्वात आलेली असल्याकारणाने ही निवडणूक पद्धतीची सुधारणा करण्यासाठी घटना बदल करावा लागणार नाही. संसदेने कायदा बदलूनच ही सुधारणा करता येईल. तरीही सुधारणा अत्यंत महत्त्वाची असल्याकारणाने तिचा मी घटना दुरुस्ती मध्ये समावेश केला आहे.

१.२. निवडणुका चांगल्या रीतीने पार पाडण्यासाठी केंद्रीय निवडणूक मंडळ आणि चीफ इलेक्शन कमिशनर निःपक्षपाती असण्याची गरज आहे. त्या दृष्टीने चीफ इलेक्शन कमिशनर, आणि इतर अशा मंडळांच्या प्रमुखांच्या नेमणुकीचा अधिकार फक्त राज्यकर्त्या पक्षाच्या हातात असता कामा नये. तो अधिकार राज्यकर्ता पक्ष, विरोधी पक्षाचा प्रमुख, सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश अशा एका (कॉलेजियम) मंडळाकडे असायला हवा. तशी घटनेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सुदैवाने पाच न्यायाधीशांच्या

घटनापीठा समोर याबाबतचा विचार सध्या चालूच आहे. अरुण गोयल या हेवी इंडस्ट्रीज खात्याच्या चीफ सेक्रेटरीला १८ नोव्हेंबरला voluntary रिटायरमेंट फ्रॉम सर्विस देण्यात आली आणि लगेच १९ नोव्हेंबरला त्यांची नेमणूक इलेक्शन कमिशनर म्हणून करण्यात आली! ते देखील दोन राज्यांतील विधानसभा निवडणुका अगदी तोंडावर आल्या असताना ! याबाबतीत घटनेतच स्पष्ट सुधारणा केली तर न्यायालयीन वाद थांबतील.

१.३. सध्या राजकीय पक्ष निवडणूक निधी म्हणून जो पैसा गोळा करतात तो गोळा करण्याची पद्धत पूर्णपणे अपारदर्शक आहे आणि ते चांगल्या लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. कोणत्या पक्षाला कोणत्या व्यक्तीने किंवा कोणत्या कार्पोरेशनने घाऊक प्रमाणावर मोठी आर्थिक मदत केली आहे हे जनतेला कळलेच पाहिजे. कारण अशा घाऊक आर्थिक मदतीमुळे राज्यकर्ता पक्ष हा जनतेचे प्रतिनिधित्व न करता अशा धनवान देणगीदारांचेच प्रतिनिधित्व करू लागतो. इलेक्शन बॉण्ड्सच्या वैधतेबद्दलचा खटला सुप्रीम कोर्टामध्ये अनेक दिवस पडून आहे. सुप्रीम कोर्टाने याबाबतीत तातडीने आणि दक्षतेने वेळ काढणे अत्यंत आवश्यक आहे. खरे म्हणजे निवडणूक निधी विषयी घटनेमध्येच सुधारणा करणे आवश्यक आहे.

१.४. सध्याचा अँटि डिफेक्शन कायदा आपल्या प्रतिनिधींना स्वतःची खरी खरी मते मांडण्यापासून वंचित करतो. मतदारांचे प्रतिनिधित्व करण्याच्या ऐवजी पक्षाच्या सत्ताधाऱ्यांचे म्हणणे त्याला मान्य नसले तरीही त्याला त्या बाजूनेच बोलावे लागते. म्हणून हा कायदा रद्द करावा. याचबरोबर मंत्रिमंडळ पडण्यासाठी कोणताही साधा ठराव मंजूर होणे पुरेसे नाही. त्यासाठी खास अविश्वासाचा ठरावच मंजूर व्हायला हवा अशी घटना दुरुस्ती करावी.

१.५. सध्याच्या कायदेमंडळाचे अधिवेशन भरवणे, स्थगित ठेवणे, समाप्त करणे या सर्व गोष्टी राज्यकर्त्या पक्षाच्या हातात असतात. त्यामुळे दिवसेंदिवस कायदेमंडळाच्या कामाचे तास आणि दिवस कमी होत चालले आहेत. अनेक कायदे त्यावर जवळपास कोणतीही चर्चा न होता काही मिनिटांच्याच कालावधीत मंजूर होणे ही देखील हल्ली वारंवार होणारी घटना आहे. राज्यकर्त्या पक्षाच्या प्रचंड बहुमतामुळे कायदे मंडळांना रबर स्टॅम्प चे स्वरूप आले आहे. राज्यकर्ता पक्ष बहुमताच्या जोरावर कायदे मंडळाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी करत चालला आहे. ही गोष्ट चांगल्या लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. त्यामुळे कायदे मंडळाचे कामकाज केव्हा सुरू व्हावे, किती तास चालावे, वर्षातून किती दिवस चालावे, याबद्दल घटनेमध्येच उल्लेख करणे आवश्यक आहे. संसदेचे किंवा विधानसभांचे कामकाज दर वर्षी किमान १२० दिवस आणि किमान चार अधिवेशनांमध्ये व्हावे हे उत्तम.

१.६. प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची निवडणूक पद्धत सर्वच स्तरावर स्वीकारल्यास सर्वच कायदेमंडळांची पाच वर्षाची मुदत पूर्ण होऊ शकेल. त्यामुळे संसद, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था अशा सर्वच निवडणुका एकाच वेळी घेणे शक्य होईल. त्यामुळे निवडणूक खर्च खूपच कमी होईल आणि वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे राज्यकारभारामध्ये अडथळे निर्माण होणे थांबेल. तशी दुरुस्ती घटनेमध्ये आवश्यक आहे.

**२. न्यायालय विषयक सुधारणा**

२.१. सध्या शेड्युल नऊ मधील कायदे न्यायालयीन परीक्षण- कक्षेच्या बाहेर आहेत. ही गोष्ट चुकीची असून कायदे मंडळांनी केलेले सर्व कायदे न्यायालयांच्या परीक्षणाच्या कक्षेमध्ये यायला हवेत. त्यामुळे शेड्युल नऊ मध्ये दिलेले खास संरक्षण रद्द करावे.

२.२. निवृत्त होणाऱ्या न्यायाधीशांना सध्या निवृत्त झाल्यानंतर लगेचच शासकीय किंवा खाजगी कॉर्पोरेशन मध्ये लाभाचे पद स्वीकारता येते. त्याबाबतीत घटना दुरुस्ती करून किमान पाच वर्षे त्यांना असे लाभाचे पद स्वीकारता येणार नाही अशी व्यवस्था करावी. असाच नियम निवृत्त लष्करी अधिकारी, निवृत्त पोलीस अधिकारी, निवृत्त इलेक्शन कमिशनर, निवृत्त उच्च शासकीय अधिकारी यांच्याबद्दलही करावा.

**३. इतर काही आवश्यक सुधारणा**

३.१ लहान मुलांना लहानपणापासूनच मिळणाऱ्या शिक्षणातील भेदभावामुळे आणि गुणवत्ता आणि इतर सोयी या बाबतीत प्रचंड असमानता असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेतल्यामुळे समाजातील

विविध वर्गांमधील अलगता आणि उच्चनीचभाव वाढत जातात. आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीबद्दल आर्थिक स्थिती– निरपेक्ष – असा जो आपलेपणा वाटायला पाहिजे तो वाटणे बंद होते. याला आळा घालण्यासाठी सर्व मुलांना त्यांच्या सर्वात जवळ असलेल्या शाळेमध्ये शिक्षण घेणे अनिवार्य करावे. त्यामध्ये अल्पसंख्यांकांचा देखील अपवाद करू नये. अल्पसंख्य, बहुसंख्य, सर्व जाती धर्माची मुले, सर्व आर्थिक परिस्थितीतील मुले यांनी एकाच शाळेमध्ये शिक्षण घेतले पाहिजे. श्रीमंतांच्या मुलांनाही अशा शाळेमध्ये शिक्षण घ्यावे लागल्या कारणाने श्रीमंत लोक त्या शाळेचा दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहतील. लहानपणापासून साहचर्य आणि एकत्र, एकाच प्रकारचे शिक्षण यामुळे विविध गटातील मुलांमध्ये बंधुभाव निर्माण होतो. अशा शेजार शाळांना अपवाद फक्त काही प्रमाणात मूकबधिरांच्या शाळा, अंध मुलांसाठीच्या शाळा आणि मानसिक/बौद्धिक दुर्बलता किंवा वेगळेपणा असणाऱ्या मुलांसाठीच्या शाळा यांचाच करता यावा.

३.२. गो हत्या. घटनेच्या आर्टिकल ४८ मध्ये दुभत्या जनावरांच्या हत्या, विशेषतः गोवंशाच्या हत्या टाळण्याकरता उल्लेख आहे. एक तर हा उल्लेख घटनेच्या धर्मनिरपेक्षतेच्या किंवा सेक्युलॅरिझमच्या मूलभूत तत्त्वाशी विसंगत आहे. दुसरे म्हणजे गोपालन करणाऱ्या किंवा पशुपालन करणाऱ्या व्यक्तीच्या त्यांचा व्यवसाय त्यांनी कशा प्रकारे करावा यासाठी असणाऱ्या स्वातंत्र्यावर बंधने आणणारा आहे. म्हणून या दोन्ही कारणांनी गोहत्येवर किंवा पशुहत्येवर बंधने आणणारे हे आर्टिकल रद्द करावे.

३.३. घटनेच्या उद्देशिकेतील समाजवादी हा शब्द काढून टाकावा. कारण समाजवाद या शब्दाचा नेमका अर्थ उद्देशिकेत दिलेला नाही. त्यामुळे या शब्दाचा अर्थ कोणीही काहीही काढू शकतो. शब्दकोशातील अर्थाप्रमाणे समाजवाद याचा अर्थ उत्पादन साधनांवरील मालकी ही समाजाची म्हणजेच शासनाची असणे, त्यांच्यावर खाजगी मालकी नसणे. त्याबरोबरच आणखी एक अर्थ असा की वस्तू आणि सेवा यांचे उत्पादन आणि वितरण, मागणी आणि पुरवठा (मार्केट सोशालिजम) या तत्त्वावर न ठेवता केंद्रीभूत प्लॅनिंगच्या (नॉन मार्केट सोशालिझम) साह्याने

## सांगा पाहू उत्तरे

१. संत चोखामेळा यांच्या पत्नीचे नाव होते 'सोयराबाई'.

२. लावणीसम्राज्ञी कै. सुलोचना चव्हाण यांना 'लावणीसम्राज्ञी' हा किताब आचार्य अत्रे यांनी दिला.

३. 'लपंडाव' खेळाला फ्रान्समध्ये 'जेयू दे कॅशे' म्हणतात.

४. ऑस्ट्रेलिया देशाची राजधानी आहे 'कॅनबेरा'.

५. भारताचा 'राष्ट्रीय वृक्ष' आहे वड (फायकस बेंगालेंसिस)

६. जगातील सर्वात उंच धबधबा व्हेनेझुएला येथे आहे व त्याचे नाव आहे 'एंजर फॉल्स'.

७. कवी ग्रेस यांचे संपूर्ण नाव माणिक सिताराम गोडघाटे आहे.

८. डेन्मार्क देशाचे चलन आहे 'डॅनिश क्रोन'.

९. 'मैं तुलसी तेरे आँगन की' हा चित्रपट कादंबरीकार चंद्रकांत काकोडकर यांच्या 'अशी तुझी प्रीत' कादंबरीवर आधारित आहे.

१०. गानसम्राज्ञी कै. लता मंगेशकर यांचे वडील मा. दिनानाथ त्यांना 'तताबाबा' या लाडाच्या खास नावाने हाक मारत.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा. ९८१९७७०९७०

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

**गोखले ब्रदर्स**

**सराफी दुकान**

**रविवार, दि. 5 पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर,**

**0231–2546585**

करणे. त्यामुळे असा गोंधळ करणारा शब्द नक्की व्याख्या न देता घटनेच्या उद्देशिकेसारख्या महत्त्वपूर्ण दस्ताऐवजामध्ये वापरणे याला माझा विरोध आहे. पण हे एवढ्यावर संपत नाही कारण उद्देशिकेमध्ये समाजवाद या शब्दाचा फार काटेकोर अर्थ दिल्यास त्यामुळे निवडून येणाऱ्या सरकारांच्या देशाची अर्थव्यवस्था कशा प्रकारची असावी याची निवड करण्याच्या अधिकारावर फारच बंधने येतील. कदाचित एवढेच उद्देशिकेत नमूद करता येईल की उत्पादन साधना वरील मालकी खाजगी असली तरी ती समाजामध्ये विखुरलेली असावी, उद्योगांची धोरणे ठरवण्याची ताकद पण या मालकीबरोबर समाजामध्ये विखुरलेली असावी आणि या उद्योगांपासून होणारा नफा देखील समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर विखुरलेला असावा. संपत्ती आणि मिळकत (income) यांचे नियमितपणे पुनर्वाटप करून आणि सामाजिक सुरक्षा धोरणे अवलंबून शासनाने संपत्ती आणि मिळकत यांच्याबाबत समाजामध्ये फार मोठी आर्थिक विषमता निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

समाजवाद हा एक शब्द वापरण्याऐवजी यामुळे काही वाक्ये वापरावी लागतील हे खरे आहे. पण त्यामुळे घटनेचा उद्देश नक्की काय आहे हे स्वच्छपणे धूसरपणा टाळून मांडता येईल.

३.४. घटनेच्या उद्देशिकेमधील सेक्युलरिझम या शब्दाचा अर्थ शासन आणि सर्व राज्य यंत्रणा पूर्णपणे धर्मनिरपेक्ष असावी, असा तरी काढला जातो, नाहीतर शासनाने सर्व धर्मांना समान वागणूक द्यावी असा सर्व - धर्म समभाव असा - तरी काढला जातो. सर्व धर्म सारखे आहेत ही कल्पनाच मुळात चुकीची आहे. प्रत्येक धर्माचा चांगला भाग, नैतिक भाग कदाचित सारखा असेल पण प्रत्येक धर्म वेगवेगळ्या प्रकारे आणि वेगवेगळ्या प्रमाणामध्ये वाईटही असतो. काही धर्म अनेक देव मानणारे आहेत, तर काही एकच देव मानतात, तर काही देवच मानत नाहीत. काही धर्मांमध्ये इतरांना आपल्या धर्मामध्ये सामावून घेणे, धर्माचा प्रसार करणे हे ईश्वरी कर्तव्यच आहे, तर काही धर्मामध्ये इतरांना सामावून घेणे जवळपास अशक्य असते. काही धर्म आपल्याच सदस्यांना धर्मबाह्य करण्याचा आणि त्यायोगे आपल्या धर्मातील सदस्यांनाच बाहेर लोटण्याचा प्रयत्न करत असतात. अशा विविध प्रकारे आणि विविध प्रमाणामध्ये असमान असलेल्या धर्मांना एक सारखी वागणूक शासनाने देणे हा एक प्रकारचा अन्याय किंवा असमान वागणूकच होय. त्यामुळे एक तर हा शब्द काढूनच टाकावा नाहीतर त्याची नक्की व्याख्या तरी द्यावी.

३.४. राज्यामधील राज्यपालाची नक्की भूमिका काय असावी आणि त्याची नेमणूक कशा प्रकारे व्हावी यात सुधारणा हवी आहे. सध्या राज्यपाल पूर्णपणे केंद्रातील सत्तेवरील राजकीय पक्षाचा एक एजंट म्हणून काम करत असतो. त्यामुळे राज्याचा राज्यकर्ता पक्ष आणि केंद्रातील राज्यकर्ता पक्ष हे दोन्ही जर एक नसले तर राज्यपाल हा राज्याच्या राज्यकारभारात एक त्रासदायक अडथळा म्हणून काम करतो. यावर उपाय म्हणून राज्यपाल म्हणून नेमणूक होण्यासाठी राज्यपालाची त्या त्या राज्यामध्ये निवडणूक होणे आवश्यक आहे. ही निवडणूक कशा प्रकारे व्हावी याबद्दल विचार करता येईल. पण याबाबतीत केंद्रातील सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी नष्ट करणे आवश्यक आहे. सध्या बऱ्याच वेळा असे राज्यपाल त्यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवलेल्या विधेयकाविषयी हो किंवा नाही असा कोणताही निर्णय न घेता कितीही दिवस ते बिल कुजवत ठेवू शकतात. याबद्दल देखील नक्की कालमर्यादा आखून देणे आवश्यक आहे. राज्यपालांसाठी एक कोड


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे - 8275606627,**
**श्री. रोहित गवळी - 9657963475**

ऑफ कंडक्ट बनवणे आवश्यक आहे.

३.५. घटनेच्या अनुच्छेद २१द्वारे जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण केलेले आहे. या अनुच्छेदानुसार कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस मारून टाकता येणार नाही किंवा अटक करता येणार नाही. ही अर्थातच नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. घटनेच्या अनुच्छेद २२ द्वारे कोणत्याही कारणाने अटक झालेल्या व्यक्तीला आपल्याला अटक का केली याची कारणे जाणून घेण्याचा आणि आपल्या वकिलामार्फत स्वतःचा बचाव करण्याचा अधिकार आहे. तसेच कोणत्याही कारणाने अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासाच्या आत सर्वात जवळच्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करणे आवश्यक आहे.

पण संविधानातील ४४ व्या सुधारणे अन्वये हे अधिकार प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली अटक झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत काढून घेतलेले आहेत ! प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली कोणत्याही व्यक्तीला दोन महिने पर्यंत काही कारणे न देता आणि दंडाधिकाऱ्यांच्या समोर हजर न करता तुरुंगात ठेवता येते! सध्याच्या unlawful activities (prevention) amendment, act, २००८ आणि amendment, 2019, यांच्या अन्वये कोणत्याही व्यक्तीस न्यायासनापुढे हजर न करता आणि निश्चित आरोपपत्र दाखल न करता कितीही काळ तुरुंगात डांबून ठेवण्याचे अधिकार शासनाला मिळालेले आहेत. शासनावर टीका करणारे विचारवंत, शोध पत्रकार, लेखक वगैरेंना गप्प बसवण्यासाठी, एक प्रकारची सेल्फ सेन्सॉरशिप निर्माण करण्यासाठी शासन या कायद्यांचा सध्या वापर करत आहे.

शासनाचे हे कायदे घटनेने दिलेल्या व्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा अक्षम्य असा उपमर्द आणि संकोच करणारे आहेत, आणि ते ताबडतोब रद्द करणे आवश्यक आहे. असे कायदे हे घटनेच्या बेसिक स्ट्रक्चरचा भंग करतात असे मला वाटते. अशा काही कायद्याखाली आरोपी अपराधी आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी पोलिसांची असत नाही. उलट पक्षी आपण निरपराध आहोत हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीची असते! आणि ही जबाबदारी त्याने तुरुंगामध्ये असताना पार पाडावयाची असते!

कोणत्याही आरोपींवरील आरोप सिद्ध करण्याचा निर्णय घेणे, त्याला गुन्हेगार ठरवणे आणि मग त्याला शिक्षा देण्याचा न्यायालयांचा अधिकार देखील हल्ली काही वेळा पोलीस बळकावून घेतात. आरोपींना दोषी ठरवून त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार पोलिसांनी अलीकडे एन्काऊंटर किलिंग द्वारे अनेक वेळा बळकावून घेतला आहे. याला आळा घालण्यासाठी घटनेमध्ये आवश्यक ती सुधारणा केली पाहिजे. अमली पदार्थांच्या वापरावर आणि व्यापारावर लक्ष ठेवणाऱ्या (NDPS कायदा, १९८५), दहशतवाद प्रतिबंधक कायदा (पोटा), प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडरींग ॲक्ट वगैरे जुलमी कायदे जनतेच्या स्वातंत्र्यावर अवास्तव अतिक्रमण करतात. त्याबाबत देखील घटना दुरुस्ती द्वारेच शासनाच्या असे कायदे करण्याच्या प्रवृत्तीवर बंधन आणले पाहिजे. असे कायदे अमलात आणण्याच्या पद्धतीत पोलीस खात्याला, enforcement directorate ला अधिक जबाबदार बनवण्यासाठी पोलीस सुधारणा अमलात आणणे आवश्यक आहे.

**३.६. जगण्याचा अधिकार**

Right to live. म्हणजेच जगण्याचा अधिकार हा अत्यंत मूलभूत मानवी अधिकारापैकी एक आहे. पण हा अधिकार सध्या फक्त जिवंत असलेल्या मानव प्राण्यांनाच आहे. अजून ज्यांचा जन्म झालेला नाही अशा मानवांच्या बाबतीत म्हणजेच येत्या पिढ्यांच्या बाबतीत हा अधिकार मान्य करण्याची आवश्यकता आहे. कारण सध्याच्या पिढीने आपल्या कार्बन उत्सर्जनावर पुरेशा प्रमाणावर बंधने आणली नाहीत तर येत्या ५०- १००वर्षात पृथ्वीचे तापमान पाच सहा सेंटीग्रेडने देखील वाढू शकेल. तसे झाले तर पृथ्वीवर मानवी जीवन अशक्यच होऊन जाईल. म्हणजेच पुढच्या पिढ्यांचा जगण्याचा अधिकार काढून घेतला जाईल. असे झाले तर मानव प्राण्याबरोबरच इतरही अनेक जीव जाती नष्ट होऊन जातील. ही भयानक आणि परत न फिरण्यासारखी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सध्याच्या पिढीच्या वर्तनामुळे अजून जन्मावयाच्या पुढील पिढ्यांच्या जगण्याच्या हक्कावर आक्रमण होणार नाही याची दक्षता घटनेने घ्यायला हवी. पुढील

पिढ्यांचा जगण्याचा अधिकार शाबूत राखण्यासाठी या पिढीने काय गोष्टी करायला पाहिजेत आणि काय गोष्टी करता कामा नये याच्यावर घटनेने निर्माण केलेल्या खास स्वायत्त अधिकाऱ्याचे किंवा संस्थेचे अभिलक्ष असले पाहिजे. शासनाने आणि जनतेने देखील आपल्या प्रत्येक कृतीचे वातावरण बदलावर काय परिणाम होतील याचा पूर्ण अभ्यास करून मगच ती कृती हातात घेतली पाहिजे, आणि ज्या कृतींचा परिणाम वातावरण बदल अधिक तीव्र करण्याकडे होणार असेल त्या कृती करता कामा नयेत. उदाहरणार्थ दगडी कोळशाचे उत्पादन वाढवणे, त्याच्या नवीन खाणी खोदणे आणि कोळशापासून वीज तयार करणारी आणखी वीज केंद्रे बनवणे. जर शासन, व्यापारी कंपन्या किंवा व्यक्ती अशा कृती करू लागल्या, तर त्याविरुद्ध न्यायालयामध्ये अजून जन्मावयाच्या पिढ्यांच्या वतीने दाद मागता यायला हवी!

**३. ७.** शासनाने आणीबाणीची परिस्थिती जाहीर केल्यानंतर देखील मूलभूत मानवी अधिकार स्थगित होता कामा नयेत.

थोडक्यात, मी वर साधारण मानाने पंधरा सुधारणा घटनेमध्ये दुरुस्ती किंवा नवीन भर या मार्गाने सुचवल्या आहेत. जागृत आणि विचारी नागरिकांनी यामध्ये खूपच भर घालावी. विशेषतः निवृत्त न्यायाधीश, पत्रकार आणि राज्यशास्त्राचे अभ्यासक यांची ही जबाबदारीच आहे..

मी पुन्हा सांगू इच्छितो की, राज्यघटना हे जनतेचे राजसत्तेच्या जुलमी आणि मनमानी कारभारापासून स्वतःचा बचाव करण्याचे महत्त्वाचे हत्यार आहे आणि जनतेचा राजसत्तेच्या अतिरेकापासून बचाव करणे हेच घटनेचे सर्वात महत्त्वाचे काम आणि उद्दिष्ट आहे. पण जनता ही अज्ञानी, विस्कळीत आणि भावनेच्या प्रवाहामध्ये वाहून जाणारी असते. त्यामुळे जनतेच्यावतीने हे काम पार पडण्याची जबाबदारी न्यायालय, निवडणूक आयुक्त आणि जागृत पत्रकार यांनी पार पाडली पाहिजे. घटना या हत्याराची धार आणि रोख कायम ठेवण्याचे काम त्यांच्यावर सोपवलेले आहे. या उलट, सत्ताधारी राजकारणी, संसदेतील बहुमताच्या जोरावर विविध कायदे करून हे शस्त्र बोथट करण्याचा प्रयत्न करत असतात. म्हणून सत्ताधारी पक्षाच्या आमदार, खासदारांनी पण ते जनतेचे प्रतिनिधित्व करतात, सत्ताधारी राजकारण्यांचे नाही, हे लक्षात ठेवावे !

**– डॉ. सुभाष आठले,**
मोबा. ९४२०७७६२४७

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**




शोकाकूल : कोल्हापूर चित्पावन संघ
पदाधिकारी, संचालक, कर्मचारी व सर्व संस्था परिवार

# संवाद

आपण दिवसेंदिवस टेकनॉलॉजीला जवळ करून माणसांना, भावनांना दूर करत आहोत. ह्याचेच दुष्परिणाम आता दिसून येत आहेत. मुलांचे मोबाईल anxiety, हट्टीपणा, चिडचिडेपणा, डिप्रेशन हे मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. ह्याचे मूळ कारण आहे तुटत चाललेला 'संवाद'. ह्याच अनुषंगाने आम्ही संवाद हा ऑनलाईन /ऑफलाईन मार्गदर्शन पर प्रोग्राम चालू केला आहे यात मुलांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास naturally कसा करता येऊ शकतो ह्या विषयी माहिती दिली जाईल.

जर ० ते ५ वर्षापर्यंतच्या चिमुकल्यांबद्दल बोलायचे झाले तर, मोठेपणी त्यांचे करिअर तसेच व्यक्तिमत्व चांगले घडले पाहिजे यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्याचा हाच योग्य काळ असतो. बालपणी या लहानग्यांना आई-वडील, आजी-आजोबा अथवा पालक यांच्या मायेचा स्पर्श... मायेची ऊब सातत्याने मिळणे कधीही चांगले. कारण याच काळात या लहानग्यांच्या मेंदूची वाढ ही खूप जोमाने होत असते आणि या मायेच्या स्पर्शज्ञानातूनच त्यांच्या मेंदूची वाढ खूप चांगल्या प्रकारे होते. वयाच्या या सुरवातीच्या काळात मेंदूची जशी जडणघडण होते, त्यानुसारच मोठे झाल्यावर या लहानग्यांचे व्यक्तिमत्व तसेच स्वभाव ठरतो. म्हणूनच म्हणतो की, आपल्या लहानग्यांना चांगले करिअर द्यायची तुमची इच्छा असेल तर, या वयात त्यांना जास्तीत जास्त वेळ दिला पाहिजे...त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या पाहिजेत...त्यांना मांडीवर घेऊन थोपटायला पाहिजे... त्यांना दररोज प्रेमाने मिठी मारली पाहिजे... डोक्यावर हात फिरवून त्यांची विचारपूस केली पाहिजे... तसेच या लहानग्यांनी सतत प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांची एखाद्या गोष्टीबद्दलची जिज्ञासा वाढली पाहिजे अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. या स्पर्शज्ञानातून, स्पर्शाच्या संवेदनेतून अथवा संवादातूनच या लहानग्यांची चांगले विचार करण्याची क्षमता निर्माण होते, परिणामी मोठेपणी त्यांचे करिअर घडण्यासाठी मदत होते.

लहान बालगोपालांच्या म्हणजेच ५ ते १० वर्षांच्या मुलांबद्दल बोलायचे झाले तर, त्यांचे उज्वल भविष्य घडायला पाहिजे या हेतूने त्यांना पूरक असलेल्या विविध कृतीकौशल्यांचा विकास बरोबर होतो आहे किंवा नाही याची पडताळणी करणे (e.g. Fine Motor Skills, Gross Motor Skills, Brain Development, Critical Thinking, Co-ordination Creativity etc.) आणि त्यानुसार त्या चिमुकल्यांना सक्षम बनविणे, हा असाच करिअर या शब्दाचा अर्थ व्हायला हवा. हे करतांना पाल्यांचा Intelligence Quotient (बुध्यांक) वाढविण्या-सोबतच Emotional Quotient (भावनिकता) आणि Social Quotient (समाजशीलता) वाढवायची आहे, हे लक्षात असणं फार गरजेचं असतं. यामुळे पाल्य स्वतःच्या भावना व्यक्त करायला, त्या भावनांचे व्यवस्थापन करायला, त्या भावनांना नियंत्रण करायला तसेच दुसऱ्यांच्या भावनांची कदर करायला शिकतो, समाजामध्ये माणूस म्हणून वावरायला शिकतो. परंतु, आजच्या या धकाधकीच्या जीवनात आपल्या या बालगोपालांकडे अश्या पद्धतीने लक्ष द्यायला वेळ आहे का कुणाकडे? आजरोजी आपण एवढे स्वार्थी झालोय की, आपले स्वतःचे करिअर घडवण्याच्या वैयक्तिक स्वार्थापोटी आपल्याच लहान मुलांकडे दुर्लक्ष करून आपण त्यांचे करिअर धोक्यात आणतोय, हीच खरी शोकांतिका आहे.

**- वैभव फाटक**

मोबा. ९७६९८३८८७३


**परशुराम पतसंस्था**
**कार्यालयीन वेळ**
**सकाळी १०.०० ते सायं. ५.००**
**देवघेवीची वेळ**
**सकाळी १० ते ४.३० पर्यंत**

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - फेब्रुवारी २०२३)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गायत्री A +ve | देशस्थ | १७/०४/९१ ५.४ | काश्यप, वृषभ कृत्तिका, अंत्य, राक्षस | M.Com C-2 Level German | बेंगलोर | वा.प्रा. ८.५० लाख | सुनिल कान्हेरे देशपांडे ताराबाई पार्क, कोल्हापूर ९८२२७९३७७४ |
| २. | कल्याणी B +ve | देशस्थ | ५/५/९२ ५.४ | काश्यप, वृषभ मृगशिर्ष, २ रे मध्य, देवगण | Elect. & Telecomm | अमेरिका | वा.प्रा. १७ लाख | अरुण इनामदार सुपर मार्केट, बेळगाव ९३७२३९७४२६ |
| ३. | मृणाल O -ve | कोकणस्थ | ३०/१०/९३ ५.२ | नित्युनंद, मेष अश्विनी, ३ रे, आद्य, देवगण | B.E./ B.Tech. | खाजगी नोकरी | वा.प्रा. ४ लाख | संजय भिडे टिळकवाडी, बेळगांव ९४८०३९८१६७ |
| ४. | शर्वरी O +ve | कोकणस्थ | १८/१२/९३ ५.५ | कपी, कुंभ धनिष्ठा, ४ थे मध्य, राक्षस | M.Com. CA Final | --- | --- | सुहास करंदीकर द.शिवाजीनगर, सांगली ९४२०४५३१७३ |
| ५. | श्रृती O +ve | कऱ्हाडे | २४/११/९४ ५.३ | भारद्वाज, कर्क पुनर्वसू, ४ थे आद्य, देवगण | E. & T C | पुणे येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. १८ लाख | विनय करमळकर टाकाळा, कोल्हापूर ९१५८८७९३५० |
| ६. | सायली A +ve | कऱ्हाडे | ३०/०६/९५ ५.१ | अत्री, कर्क पुष्य, ४ थे मध्य, देवगण | BA/MBA Mkt. | पुणे येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. ३.३६ लाख | राजेंद्र मु. सबनीस स्टेशन रोड, नालासोपारा मुंबई. ८९७६८८२३१४ |
| ७. | पियुषा B +ve | कोकणस्थ | ०४/१०/९६ ४.११ | शांडिल्य, मिथुन आर्द्रा, ३ रे आद्य, मनुष्य | M.Com. (A/C) Dip Tax. | पुणे येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. १.८० लाख | सतीश के. जोशी माळी कॉलनी, कोल्हापूर ९९२२२७२९५९ |
| ८. | हर्षदा O +ve | देशस्थ | ०१/०३/९७ ५.१ | भारद्वाज, वृश्चिक अनुराधा, २ रे मध्य, देवगण | B.Tech. Info. Techno. | मुंबई येथे खाजगी नोकरी | वा.प्रा. ४ लाख | विजय गोविंद जोशी श्रीसमर्थ कॉलनी, सांगली ८०८७८२०४४९ |
| ९. | वेदांगी A +ve | वैष्णव | ०३/०७/९७ ५.७ | पुतमाश्य, वृषभ, मृग, २ रे मध्य, देव | B.E. Comp. | ठाणे मुंबई येथे नोकरी | वा.प्रा. ४ लाख | मुकुंद बेंडेगिरी आर.के.नगर, मोरेवाडी कोल्हापूर. ७०२०९२१६८७ |
| १०. | रमा O +ve | कऱ्हाडे | ०८/०५/९८ ५.३ | अत्री, कन्या हस्त, ३ रे आद्य, देवगण | B.Tech CSE | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | आशुतोष शा. फणसळकर फणसळकर वाडा. मिरज ९४२२३७६४९९ |
| ११. | हरिप्रिया A +ve | देशस्थ | १२/०२/९९ ५.३ | वसिष्ठ, धनू मूळ, ४ थे आद्य, राक्षस | MBA Finance | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. १.०८ लाख | राजेंद्र रघुनाथ रामदासी संभाजीनगर स्टँडजवळ ७७२१९२२२९४ |

### मिनाक्षी सुनील देशपांडे (प्रथम वधू) (देशस्थ)

**जन्मतारीख :** ०९/१२/१९९३ **उंची :** ५.२
**शिक्षण :** M.Com. & C1 Leval **नोकरी :** नाही
**पत्ता : श्री. सुनिल कान्हेरे देशपांडे** ताराबाई पार्क, कोल्हापूर.
मोबा. ९८२२०९३७७४, ९८८१३४६८६८
**अपेक्षा :** उच्चशिक्षित, अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | कन्या | चित्रा | २ रे | मध्य | राक्षस |

**लग्न ठरलेले वधू-वर :-**
वधू : चारुलता मारुलकर वर : जीवन कुलकर्णी

### जान्हवी मिलींद कुलकर्णी (प्रथम वधू)

**जन्मतारीख :** १२/०३/१९९९ **उंची :** ५ फूट
**शिक्षण :** B.E. (Mech. Engg.) **(देशस्थ)** (B +ve)
**नोकरी :** 'वंदेक' या बेंगलोर येथील कंपनीत नोकरी
(सध्या कोल्हापूर येथे) **वा.प्रा. :** ५ लाख
**पत्ता : श्री. मिलींद कुलकर्णी,** सासने कॉलनी, कोल्हापूर.
मोबा. ९०४९००८१९५. ७७६७९७३७६३
**अपेक्षा :** चांगली नोकरी, नातेसंबंध जपणारा असावा.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| जमदग्नी | धनु | पूर्वाषाढा | पहिले | मध्य | मनुष्य |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - फेब्रुवारी २०२३)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विक्रांत (चेतन) A +ve | देशस्थ | १४/०८/८७ ५.८ | भारद्वाज, मेष अश्विनी, १ ले आद्य, देवगण | B.Sc. (MM) | वेंच्युरा टेक्नॉ. बालेवाडी पुणे | वा.प्रा. ५.१० लाख | विश्वास आफळे मु.पो.मसूर, ता. कराड ९६३७७८११४४ |
| २. | विनायक AB +ve | देशस्थ | २६/१२/८८ ५.८ | गौतम, कर्क, पुष्य, ४ थे मध्य, देवगण | B.A. Steno | जे.पी.मॉर्गन कं.पवई, ठाणे | वा.प्रा. २५ लाख | रघुनाथ गोविंद कुलकर्णी मु.पो.गडहिंग्लज ९९२२१५४२०३ |
| ३. | संकेत O +ve | देशस्थ | १६/०९/८९ ५.५ | श्रीवत्स, मीन, उ.भाद्रपदा,४थे मध्य, मनुष्य | BCA | नोपरी पुणे येथे | वा.प्रा. ५.५० लाख | भानुदास ना. जोशी मंगळवार पेठ, कोल्हापूर ९९७५५१४०१८ |
| ४. | अभिषेक B +ve | देशस्थ | १६/०३/९० ५.११ | काश्यप, तुळ, विशाखा, ३ रे अंत्य, राक्षस | MPA Mumbai | नोकरी व्यावसायिक | वा.प्रा. ७ लाख | संजय दत्तात्रय जोशी महाद्वार रोड, कोल्हापूर ९८५०२७०१०० |
| ५. | स्वराज O +ve | देशस्थ | ३०/०९/९१ ५.१० | जमदग्नी, मिथुन मृग, मध्य, देवगण | B.C.S. CCNA Hard. Net | कोल्हापूर येथे नोकरी | मा.प्रा. २०,०००/- | भालचंद्र वि. कुलकर्णी मोरेवाडी, कोल्हापूर. ९९७५३२७७२० |
| ६. | चैतन्य O - ve | देशस्थ | २४/०६/९२ ५.२ | वसिष्ठ, मीन, रेवती, २ रे, अंत्य, देवगण | B.A. | महावितरण मध्ये नोकरी कायमस्वरुपी | वा.प्रा. ८ लाख | श्रीमती स्नेहल श्रीराम अंकलीकर, सानेगुरुजी, कोल्हापूर ९५४५७९१०६४ |
| ७. | विनय O +ve | देशस्थ | १०/०६/९३ ५.४ | गौतम, कुंभ धनिष्ठा, ३ रे मध्य, राक्षस | B.E. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ५.२५ लाख | वासुदेव रामचंद्र अंबपकर पेठ वडगाव, ता.हातकणंगले ९७६४८१८१३६ |
| ८. | श्रेयस O + ve | देशस्थ | ११/०९/९४ ५.७ | भारद्वाज, वृश्चिक अनुराधा, २ रे मध्य, देवगण | B.E. Mech MBA | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ११ लाख | भारतभूषण ल. सराफ राजारामपुरी, कोल्हापूर ९४०३४६७४९२ |
| ९. | अमेय A +ve | देशस्थ | ०८/०६/९५ ५.५ | अत्री, कन्या हस्त, २ रे आद्य, देवगण | M.Tech. (Civil) | डी.वाय. पाटील कॉलेज येथे नोकरी | वा.प्रा. २.४० लाख | विनायक वसंत दिवाण शाहूपुरी, कोल्हापूर ९९२२७८४०१० |
| १०. | कैवल्य O +ve | देशस्थ | १६/०४/९६ ५.७ | काश्यप, मीन उ.भाद्रपदा, १ ले मध्य, मनुष्य | B.E.(Prod) MBA Op. Man. | हुपरी येथे नोकरी | वा.प्रा. ५ लाख | राजेंद्र रामचंद्र शास्त्री हुपरी, कोल्हापूर ९९२२८१०६०१ |

**नितीन नारायण नेने** **कोकणस्थ** (O +ve)

**जन्मतारीख :** ९/९/८३ **उंची :** ५.४ **शिक्षण :** S.S.C.

**व्यवसाय :** भिक्षुकी **मा.प्रा. :** ४० हजार

**जन्मठिकाण :** मुंबई (बोरिवली)

**पत्ता : नितीन नारायण नेने**

मु.पो.वाडा देवगड मोबा. 9049536457, 9730375928

**अपेक्षा :** ब्राह्मण (कोणतीही पोटशाखा) समजुतदार, मनमिळावू, अनुरुप (पत्रिकेत मंगळ आहे पण तो कर्क राशीचा नीच राशीचा असल्याने दोष नाही.)

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विष्णुवृद्ध | कन्या | चित्रा | -- | मध्य | राक्षस |

**रोहन सुरेश हेर्लेकर (नाममात्र घटस्फोटीत)**

**जन्मतारीख :** १०/१०/१९८५ **उंची :** ६ फूट **(देशस्थ)**

**शिक्षण :** BBA, Dip in ENTC, CCNA, CCNP

**व्यवसाय :** रोहन नेटवर्किंग सोल्युशन्स **मा.प्रा.** : ४०,०००/-

**पत्ता : श्री. सुरेश हेर्लेकर**

जरगनगर, कोल्हापूर. मोबा. ७५८८८४०६४९, ९७६६२४५७९९

**अपेक्षा :** कोणतीही पोटशाखा चालेल, शक्यतो प्रथम वधू घटस्फोटीत, विनाअपत्यही चालेल, मुलगा कोल्हापूरात राहूनच पुणे व कोल्हापूर येथील काम बघतो.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | कर्क | आश्लेषा | ४ थे | अंत्य | राक्षस |

## धुंदुरमास सोहळा उत्साहात



समस्त ब्राह्मण समाजातर्फे रविवार दि. ८ जानेवारी रोजी सकाळी मंगलधाम हॉल येथे पौष मासानिमित्त सामुदायिक धुंदुरमास सोहळा उत्साहात साजरा झाला. यावेळी प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. नंदकुमार जोशी यांनी मासाचे वैज्ञानिक महत्त्व, तर वैद्य विवेक हळदवणेकर यांनी धुंदुरमास आणि आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. सच्चिदानंद कानिटकर यांनी धुंदुरमासाची महती विशद केली.

सकाळी महेश आपटे यांच्या हस्ते संकल्प करण्यात आला. त्यानंतर सूर्याष्टक, महाआरती, गायत्री मंत्र पठण आणि महानैवेद्य दाखवण्यात आला. पौरोहित्य स्वप्नील जोशी यांनी केले. चित्पावन संघाचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी प्रास्ताविक, तर ॲड. विवेक शुक्ल यांनी स्वागत केले. मकरंद करंदीकर यांनी उपक्रमाची माहिती दिली. आभार श्री. श्रीकांत लिमये यांनी मानले.

यावेळी दिलीप गुणे, केदार जोशी, संतोष साने, प्रसाद खाडिलकर, रामचंद्र टोपकर, संतोष कोडोलीकर, शामराव जोशी, मिलिंद पावनगडकर, विनोद डिग्रजकर, महेश धर्माधिकारी, समीर गोवंडे, अशोक जोशी, अमेय गोखले, सुप्रिया रानडे उपस्थित होते.

## महिलांसाठी दीपावली प्रदर्शन - संघाचा अनोखा उपक्रम



या दिवाळीला प्रथमच कोल्हापूर चित्पावन संघाने महिलांकरीता विक्री प्रदर्शन आयोजित केले होते. जेणेकरून महिलांना विक्रीसाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संघाने चांगला प्रयत्न केला व तो खूपच यशस्वी झाला. दि. १८ व १९ ऑक्टोबर २०२२ रोजी मंगलधाम येथे सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन भरविणेत आले होते. सर्वांना प्रेरणा मिळावी या हेतूने 'श्री घरगुती बिस्किटे' च्या सौ. तेरदाळे मॅडम यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमासाठी संघाचे अध्यक्ष श्री. मराठे साहेब, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे, केदार जोशी, सौ. संगीताआपटे, श्री. संतोष साने, सौ. सीमा गोखले उपस्थित होते. तसेच कार्यक्रम उत्तम रितीने पार पाडण्यासाठी सर्व संचालक मंडळ व सौ. सुप्रिया रानडे, अपूर्वा केळकर यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमात एकूण २२ स्टॉलधारकांनी सहभाग घेतला होता. सर्व स्टॉलधारकांकडून संघाचे नेटक्या आयोजनाबद्दल अभिनंदन देखील करण्यात आले.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.



- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.